# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

(भाग २ रा)

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स
मुंबई – ४०० ०१२

☯ **ॐ वनिता बुक्स**

☯ **पुष्प सातवे**

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

| | | |
|---|---|---|
| प्रथमावृत्ती | – | २००० |
| द्वितीयावृत्ती | – | २००३ |
| तृतीयावृत्ती | – | २००६ |
| चतुर्थावृत्ती | – | २००९ |
| पंचमावृत्ती | – | २०११ |
| षष्ठमावृत्ती | – | २०१४ |
| सप्तमावृत्ती | – | २०१५ |
| अष्ठमावृत्ती | – | २०१६ |
| नवमावृत्ती | – | २०१८ |

☯ **प्रकाशक**

**ॐ वनिता बुक्स**

बी २१३,

सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),

डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.

दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

☯ **मूल्य : रु. १३०/–**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | कर्मगती | ५ |
| २. | निहित कर्म | १८ |
| ३. | श्रीमंती–गरिबी | ४० |
| ४. | प्रकाशमार्ग व अंधारमार्ग | ४६ |
| ५. | ईश्वरीशिक्षा कशा होतात ? | ७६ |
| ६. | ईश्वरीकृपा कशी होते ? | ९४ |
| ७. | कर्मयोनी–भोगयोनी | १०१ |
| ८. | थोडे अद्भुत, थोडे गूढ | १०८ |

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

– स्वामी दत्तावधूत

# १. कर्मगती

जन्माला आल्यापासून मरेपर्यंत मनुष्य कर्म करीतच असतो व कर्माचे विविध परिणाम भोगत असतो. जोपर्यंत कर्मबंधनातून मानवाची सुटका होत नाही, तोपर्यंत मानवाला मुक्ती प्राप्त होत नाही, म्हणून मानवाने कर्म करताना विचार करून कर्म करावे, असे सर्व साधू-संतांनी सांगितले आहे.

पुष्कळ लोकांना असे वाटते की, आपण आपल्या आयुष्यात कुठलाच गुन्हा केला नाही, तरीही आपल्यावर देव कृपा का करीत नाही, अशा लोकांच्या हे लक्षात येत नाही की, 'स्वार्थी असणे' हा परमेश्वराच्या दरबारातील फार मोठा गुन्हा आहे.

सतत खोटे बोलत राहणे, दुसऱ्यांना उल्लू बनवत राहणे, फसविणे या गोष्टी परमेश्वराला आवडत नाहीत. अशा लोकांना

कठोर शिक्षा केल्या जातात.

सरळ मनाच्या माणसाला परमेश्वराच्या दरबारात अतिशय मानाचे स्थान मिळते. आत एक व बाहेर एक असे वागणाऱ्यांची रवानगी नरकात केली जाते.

केवळ आपल्यापुरताच विचार करणारा, केवळ स्वत:पुरताच जगणारा, फक्त स्वत:च्याच कुटुंबाचा विचार करणारा, असा मनुष्य मृत्यूनंतर पिशाच्च योनीत हजारो वर्षे खितपत पडतो.

परोपकारी, प्रेमळ, इतरांना मदत करणारा, मोठ्या मनाचा, दिलदार, दानधर्म करणारा, नि:स्वार्थी, ईश्वरभक्ती करणारा, सद्गुणी, इतरांचे भले व्हावे म्हणून प्रयत्न करणारा मनुष्य मृत्यूनंतर स्वर्गलोकात जातो, हजारो वर्षे स्वर्गलोकात राहतो व स्वर्गलोकाहूनही अतिशय उच्च लोकात त्याला प्रवेश प्राप्त होतो. असा आत्मा परत पृथ्वीतलावर जन्माला येत नाही.

जे लोक कंजूष असतात, दानधर्म व परोपकार करत नाहीत, अशा लोकांच्या बुद्धीवर कालांतराने पिशाच्च सृष्टीतील आत्मे आपला प्रभाव पाडू लागतात. हळूहळू त्यांची बुद्धी सैतानाच्या ताब्यात जाते. असे लोक नेहमी बेचैन, अशांत व फक्त स्वार्थाचा विचार करणारे असे होतात. मृत्यूनंतर असे लोक पिशाच्च बनतात. अशा घराण्याला पुढे शंभर वर्षे दारिद्र्य येते.

कंजूष माणसाने जी संपत्ती गोळा केलेली असते, ती चोर लुटून नेतात किंवा अग्निच्या भक्षस्थानी पडते. कंजूष प्रवृत्तीमुळे

व स्वार्थी प्रवृत्तीमुळे मानव समाजामध्ये अनेक विकृती निर्माण होतात व संपूर्ण समाज पोखरला जातो. सर्व समाजाला याचे दु:ख भोगावे लागते.

कंजूष प्रवृत्ती, स्वार्थी प्रवृत्ती व इतरांवर सत्ता गाजविण्याची प्रवृत्ती अशा वाईट प्रवृत्तींमुळे समाजाचे सामूहिक प्रारब्ध दूषित होते व सामूहिक प्रारब्ध (collective fate) दूषित झाल्यानंतर युद्ध, भूकंप, अवर्षण अशा नैसर्गिक आपत्ती पृथ्वीतलावर कोसळतात.

ज्याप्रमाणे मानवाला प्रारब्ध असते, त्याप्रमाणे जमिनीच्या तुकड्यालाही प्रारब्ध असते.

एकदा एका सत्पुरुषाने वैराण माळरानाकडे पाहून म्हटले, ''या जागेचा अभ्युदयकाळ जवळ आला आहे. लवकरच येथे इमारती उभ्या राहतील.''

सत्पुरुषाच्या या बोलण्याकडे लोकांनी दुर्लक्ष केले; कारण त्या काळी त्या जागेमध्ये प्यावयास पाणी नव्हते, अन्य कुठल्याही सोयी नव्हत्या. त्याकाळी ती जागा कोणी फुकट दिली असती, तरी कोणी घेतली नसती.

सत्पुरुषाने उद्गार काढून वीस वर्षे होऊन गेली आहेत व आज (१९९६) तेथे भव्य इमारती उभ्या आहेत.

जी जागा एके काळी कोणी फुकट घेत नव्हते, ती जागा आता चौरस फुटाच्या भावाने विकत घेत आहेत.

या पृथ्वीतलावरील प्रत्येक जड व चेतन वस्तूला तिचे प्रारब्ध असते. वातावरणातील अदृश्यशक्ती जड व चेतनेवर आपला प्रभाव दाखवीत असतात. त्यापैकी मानव योनीला कर्मयोनी म्हटले जाते व मनुष्येतर योनीला भोगयोनी म्हटले जाते. मनुष्येतर योनीतील आत्मे आपल्या प्रारब्धाचा भोग संपवून परलोकात निघून जातात. त्यांनी फक्त प्रारब्ध भोगावयाचे असते. **सत्कर्म – दुष्कर्म** असा काही प्रकार मनुष्येतर जीवांना नसतो. ते फक्त आपल्या प्रारब्धाचा भोग भोगून संपवितात; परंतु त्यांना प्रारब्ध असतेच व या प्रारब्धानुसार **सुख–दुःख, क्लेश, कष्ट, बंधनमुक्त** असे भोग त्यांच्या वाट्याला येत असतात. हे प्रारब्धाचे भोग भोगत असताना सहानुभूती दाखविणारे त्यांच्या जवळपास कोणी नसते.

एखाद्या माकड किंवा अस्वलाला मदाऱ्याच्या बंधनात राहावे लागते व तो नाचवील तसे नाचावे लागते. उपाशी–तापाशी त्याच्याबरोबर फिरावे लागते व मारही खावा लागतो. हे त्या माकडाचे अथवा अस्वलाचे प्रारब्ध होय. याला क्लेशकारी, कष्टकारी, बंधन प्रारब्ध असे म्हणतात.

अशा प्रकारे सर्कशीमध्ये वाघ, सिंह, हत्ती इत्यादी प्राणी आपण पाहतो, मदाऱ्याकडे माकड, अस्वल पाहतो. गारुडी सर्प घेऊन फिरत असतात, शेतात बैल राबत असतात. हे सर्व आत्मे पूर्वजन्मीचे मानव असतात. आपल्या धन्याचे ते ऋणी असतात. आपल्या या धन्याकडून त्यांनी पूर्वजन्मी ऋण घेतलेले

असते. मरेपर्यंत ते हे ऋण फेडू शकत नाहीत. काही लोकांनी तर फसवणूक केलेली असते. याशिवाय परत मनुष्यजन्म मिळावा इतकी पुण्याई त्यांच्याजवळ नसते. त्यांच्या कर्मगतीनुसार त्यांना मनुष्येतर योनी प्राप्त झालेली असते व मनुष्येतर योनीत राहून आपले ऋण फेडण्यासाठी ते सांप्रत आपल्या या धन्याकडे बंधन प्रारब्ध भोगत असतात.

या प्राण्यांचे जे धनी असतात,ते दारिद्र्याने गांजलेले असतात. हे मदारी, गारुडी म्हणजे पूर्वजन्मातील अतिशय श्रीमंत लोक होत. पूर्वजन्मात यांनी भरपूर श्रीमंती भोगलेली असते व दानधर्म केलेला नसतो, परोपकार केलेला नसतो. हे लोक अतिशय कंजूष असतात व कंजूषपणाचा परिणाम म्हणून त्यांची संपत्ती इतर काही सामान्य लोकांनी हडप केलेली असते.

ज्या अतिसामान्य लोकांनी (चोर, फसवणूक करणारे, मजूर, हमाल इत्यादी) या कंजूष माणसांची संपत्ती पळविली ती सर्व माणसे मृत्यूनंतर अस्वल, माकड, सर्प अशा मनुष्येतर योनीत जन्माला गेली व जे लोक कंजूषपणाने वागले, दानधर्म, परोपकार केला नाही, असे लोक गारुडी, मदारी अशा जन्माला गेले.

अशा प्रकारे जन्म, मरण व पुनर्जन्म असे हे चक्र अनादी काळापासून चालत आले आहे व पुढे अनंत काळ चालत राहणार आहे.

माझे एक मित्र होते. वयाच्या सत्तराव्या वर्षी वृद्धापकाळाने

त्यांना मृत्यू आला. मृत्यूनंतर काही दिवसांनी ते आपल्या मुलाच्या स्वप्नात आले व म्हणाले ‘‘मी X या व्यक्तीचे दहा रुपये देणे आहे. तेवढे जर तू दिलेस तर मी आता आहे त्यापेक्षा आणखी एक स्तर वर जाईन व मला सद्गती प्राप्त होईल.’’

वडिलांच्या आज्ञेप्रमाणे मुलाने X चे पैसे दिले. त्याच रात्री मुलाच्या स्वप्नात येऊन वडिलांनी मुलाला आशीर्वाद दिला व आभार मानले. ‘मला सद्गती मिळाली,’ असे ते म्हणाले. वडिलांचा प्रसन्न चेहरा बघून मुलाला खूप आनंद झाला.

एकदा एका मुलाच्या स्वप्नामध्ये त्याचे मृत वडील येऊन म्हणाले, ‘‘पृथ्वीतलावर जीवन व्यतीत करत असतांना मी दानधर्म, परोपकार करून काहीच पुण्य गोळा केले नाही, उलट एका व्यापाऱ्याचे सुमारे आठशे रुपये मी देणे आहे. परिणामी त्या व्यक्तीच्या घरामध्ये मला बैलाच्या रूपाने नुकताच जन्म मिळालेला आहे.

त्याच्या गाईने नुकत्याच एका वासराला जन्म दिला असून, त्या वासराच्या मस्तकावर पांढऱ्या रंगाचा गोल चांद आहे. तो मीच आहे. तू जर त्या व्यक्तीचे पैसे दिलेस, तर मला त्या योनीतून मुक्ती मिळेल.’’

मुलाने त्या व्यापाऱ्याचे पैसे नेऊन दिले. काही मिनिटांतच घरातील व्यक्तीने येऊन वासरू मेल्याची बातमी व्यापाऱ्याला दिली. अगदी सुस्थितीत असलेले वासरू अचानक कसे मेले

याविषयी आश्चर्य व्यक्त करीत तो व्यापारी व मृत व्यक्तीचा मुलगा गोठ्यात गेले.

वासरू मरून पडले होते. त्याच्या कपाळावर पांढऱ्या रंगाचा गोल चांद होता.

वासराच्या मृत्यूचे रहस्य मृत व्यक्तीच्या मुलास माहीत होते; परंतु ते रहस्य त्याने वासराच्या मालकास सांगितले नाही. आपल्या वडिलांच्या आत्म्यास सद्‌गती मिळाली याचे त्याला समाधान मिळाले. तद्‌नंतर त्याने आपल्या वडिलांच्या नावाने खूप दानधर्म केला; तसेच स्वत:ही खूप दानधर्म व परोपकार केला.

मनुष्य जेव्हा सृजनात्मक कर्म करतो, तेव्हा त्याच्या आत्म्याची उन्नती होते व मनुष्य जेव्हा विघातक - हिंसक कर्मे करतो, तेव्हा त्याच्या आत्म्याची अधोगती होते.

जेणेकरून वातावरणामध्ये आनंद पसरतो, स्वत:ला व इतरांना आनंद होतो, अशा कृतीला सृजनात्मक कर्म असे म्हणतात.

ईर्षा, द्वेष, मत्सर, इतरांवर जळणे, इतरांवर हुकमत गाजवणे, सत्तेची हाव असणे; तसेच सर्व प्रकारच्या हिंसक प्रवृत्ती मानवाला अधोगतीला नेतात.

येथे मला एक गोष्ट आठवते. एका कंपनीमध्ये एक मोठे ऑफिसर होते. लठ्ठ पगार, बंगला, गाडी अशी सर्व सुखे त्यांच्याकडे होती. संपूर्ण आयुष्य सुखासमाधानात व आनंदात गेले.

निवृत्तिवेतनही भरपूर मिळत होते. फंड, ग्रॅच्युईटीचेही लाखो रुपये मिळाले. अशी काही वर्षे गेल्यानंतर हृदयविकाराचा झटका येऊन एक दिवस त्यांना मरण आले.

आप्तेष्ट व मित्रमंडळींनी त्यांच्या भाग्याची वाहवा केली. आयुष्यभर सुखाने जगले व मृत्यूही एका क्षणात आला, असे म्हणून त्यांच्या भाग्याची तारीफ करू लागले.

मृत्यूनंतर काही महिन्यांनी त्यांच्या मुला-मुलींना एकाच प्रकारची स्वप्ने पडू लागली.

स्वप्नामध्ये त्यांचे ऑफिसर वडील येऊन त्यांना सांगू लागले........

''मला खूप यातना होत आहेत. माझ्या नावाने दानधर्म करा. कमीत कमी लाख-दीड लाख रुपये तरी माझ्या नावाने दानधर्म करा, म्हणजे मला सद्‌गती मिळेल.''

त्यांच्या मुला-मुलींनी या स्वप्नाकडे दुर्लक्ष केले व दानधर्म केला नाही. कालांतराने या मृत ऑफिसरच्या मुलांना विविध प्रकारचे रोग झाले. सुखशांती त्यांच्या घरांमधून निघून गेली, घरातील बरकत नष्ट झाली व साठलेला सर्व पैसा नष्ट झाला. दारिद्र्य व रोगराई यांचे ते घर निवासस्थान झाले व त्या घरातील सर्व लोक पिशाच्च योनीत गेले.

एखादा मनुष्य केवळ सुखासमाधानात जगला म्हणजे मृत्यूनंतर त्याला सद्‌गती प्राप्त होतेच असे समजणे चुकीचे आहे.

परलोकातील नियम अतिशय भिन्न असून, परलोकात स्वार्थाला महापाप मानले जाते, तसेच जे लोक फक्त स्वत:च्या पोटापुरते जगतात, स्वत:पुरतेच जगतात, अशा लोकांना पापी समजले जाते. मृत्यूनंतर अशा लोकांना खूप मोठ्या शिक्षा भोगाव्या लागतात, म्हणून सर्व साधू-संतांनी '**पुण्य परोपकार। पाप ते परपीडा ॥**' असे सांगितले आहे. यासाठी प्रत्येक मानवाने सतत परोपकार करत राहिले पाहिजे, ईश्वरभक्ती करत राहिले पाहिजे व आपल्या उत्पन्नातील किमान पंधरा टक्के रक्कम दानधर्मात खर्च केली पाहिजे, म्हणजे मृत्यूनंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही.

मानवी जीवनातील गूढ रहस्ये, आत्मसिद्धी व भारतीय गूढविद्या ही माझी पुस्तके यापूर्वीच प्रसिद्ध झालेली आहेत. काही ईश्वरभक्त, ईश्वरसेवा म्हणून ही पुस्तके प्रकाशकाकडून विकत घेत व आपल्या आप्तेष्टांना भेट देत. अशीच काही पुस्तके आपल्या मित्रमंडळींना भेट दिल्यानंतर एका मुलीला स्वप्न पडले. स्वप्नात तिचे दिवंगत वडील आले व म्हणाले,

''स्वामी दत्तावधूतांची पुस्तके लोकांना भेट देऊन तू जी काही पुण्याई मिळविलीस त्या पुण्याईने पिशाच्च योनीतून माझी आज सुटका झाली. आमच्या काळामध्ये (म्हणजे मी पृथ्वीतलावर जिवंत असताना) जर अशी पुस्तके प्रकाशित झाली असती, तर आमचा केव्हाच उद्धार झाला असता. अशीच सेवा करत

राहा.'' असे सांगून मुलीला आशीर्वाद देऊन तिचे वडील निघून गेले.

काही दिवसांनंतर त्या मुलीने वरील हकिकत मला सांगितली व ती म्हणाली,

''आमच्या वडिलांवरती कोणीतरी करणी केली होती व त्या करणीतच ते मरण पावले. तद्नंतर ते कधीही घरातील कोणाच्याही स्वप्नात आले नाहीत.''

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, एखाद्या सिद्धपुरुषाची अथवा सत्पुरुषाची अथवा परमेश्वराची सेवा म्हणून आपण जे काही सत्कर्म करतो त्याचे फळ आपल्याला तर मिळतेच; पण त्याचबरोबर आपल्या पूर्वजांनाही मिळते.

परोपकारी माणसाला कुठल्याही गोष्टीची कमतरता पडत नाही. वातावरणातील अदृश्य देवदेवता त्याला सदैव मदत करत राहतात.

मनुष्य जेव्हा परोपकार करणे सोडून देतो, तेव्हा व्यक्तिगत, सामाजिक तसेच इतर अनेक समस्यांचा जन्म होतो.

संपत्ती व सुख मलाच मिळावे, इतरांना मिळू नये ही दुष्प्रवृत्ती कंजूषपणाला जन्म देते व एकदा का कंजूषपणा अंगी भिनला की, सर्व संपत्ती तर नष्ट होतेच; पण त्याचबरोबर आत्म्याचीही अधोगती होते. कंजूषपणा या एका दुर्गुणामुळे आत्म्याची अशी काही दुर्गती होते की, हजारो वर्षांच्या अनेक

प्रकारच्या शिक्षा भोगल्यानंतरही दुर्गतीच्या गर्तेत पडलेला आत्मा पुनश्च मूळ पदावर येऊ शकत नाही.

अनादी काळापासून इ.स. १८०० पर्यंत मनुष्यजन्म मिळणे अतिशय दुरापास्त होते. इ.स. १८२५ नंतर घोर कलियुग सुरू झाले. या घोर कलियुगामध्ये परमेश्वराने अदृश्य सृष्टीतील नरकातील, तसेच मनुष्येतर योनींतील विविध प्रकारच्या आत्म्यांना उद्धाराची संधी म्हणून मनुष्यरूपाने जन्म घेण्यास मुभा दिली. मनुष्यजन्म प्राप्त होण्याकरिता पूर्वीच्या काळी जे काही मूलभूत पुण्य असण्याची आवश्यकता असे, तो नियम परमेश्वराने शिथिल केल्याने १८२५ नंतर हळूहळू पृथ्वीतलावर मानवांची संख्या वाढू लागली व आज ही संख्या पराकोटीला जाऊन पोहोचली आहे. परमेश्वराने मानवाला दिलेल्या या अमूल्य संधीचा मानवाने भरपूर दुरुपयोग केलेला असल्याने इ.स. २०००च्या आसपास विविध कारणांनी पृथ्वीतलावरील जनसंख्या कमी व्हावयास सुरुवात होईल व इ.स. २०२५ पर्यंत ती बऱ्याच प्रमाणात कमी झालेली असेल आणि ईश्वराचे जुने नियम इ.स. २०२५ मध्ये पुनश्च लागू होतील.

मनुष्यदेह हे एक वाहन असून,परमेश्वराने आत्म्याला हे वाहन आध्यात्मिक उन्नतीकरिता दिले आहे. मनुष्यजन्म देऊन परमेश्वर आत्म्याला पृथ्वीतलावर शिकण्यासाठी पाठवितो. पृथ्वी हे एक फार मोठे विश्वविद्यालय असून, येथे जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाने आपले **'निहित कर्म'** करीत असताना ते अशा

प्रकारे करावयाचे असते की, जेणेकरून मृत्यूनंतर त्याला सद्गती मिळेल; तसेच त्याची आध्यात्मात प्रगती होईल; तसेच पुढील जन्मसुद्धा मनुष्याचे मिळतील. या सर्व गोष्टींचा विचार करून कर्म करावयास हवे.

यासाठी प्रत्येक कर्म करताना स्वत:शी तसेच ईश्वराशी प्रामाणिक राहून कर्म करावयास हवे व आपल्याला पाप लागणार नाही, याची दक्षता घ्यावयास हवी. ज्या कर्माने आशीर्वाद मिळतील, असेच कर्म करावयास हवे. शक्यतो कोणाला दुखवू नये. इतरांना दु:ख दिल्याने फार मोठे पाप लागते. इतरांना आनंद देण्याचा प्रयत्न करावा. कुणावरही अन्याय करू नये. नेहमी अन्नदान करत राहावे. सर्वांना मदत करत राहावे. अहंकार करू नये. कसलाही स्वार्थ करू नये. दररोज किमान दोन तास ईश्वराचे नामस्मरण करावे. किमान अर्धा तास प्राणायाम करावेत. प्राणायामाने सूक्ष्मशरीर स्वच्छ होते. ईश्वराच्या नामस्मरणाने मन स्वच्छ होते व मनाला प्रसन्नता वाटते.

हेवा-दावा, द्वेष-मत्सर व स्वार्थ या दु:ष्प्रवृत्तींनी सत्कर्माने मिळविलेले सर्व पुण्य नष्ट होते. म्हणून हेवा-दावा, द्वेष-मत्सर करू नये. अंतर्निरीक्षण करून स्वत:च्या मनातील दोष शोधावेत व त्यांना काढून टाकण्याचा प्रयत्न करावा व सतत ईश्वराची प्रार्थना करत राहावे.

**परोपकारार्थं इदं शरीरम् ।**
**ईश चिंतनार्थं इदं मनः ।**
**विवेकार्थं इदं बुद्धि ।**
**ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।**

**अर्थ –** शरीर हे परोपकार करण्यासाठी आहे. मन हे ईश्वराचे चिंतन करण्यासाठी आहे. चांगले काय व वाईट काय याचा विचार करून वागणे म्हणजे विवेक आणि हा विवेक करण्यासाठीच परमेश्वराने बुद्धी दिलेली आहे आणि मानवी जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.

○○○

# २. निहित कर्म

निहित कर्म म्हणजे मानवाला त्याच्या प्रारब्धानुसार प्राप्त झालेले कर्म. हे कर्म अतिशय जपून करावे लागते. हे कर्म करताना पाप लागणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. निहित कर्मे कुणाची, कशी असतात व या निहित कर्मात चांगले काय, वाईट काय, पाप कसे लागते, पुण्य कसे मिळते याचा विचार आपण या अध्यायात करू.

## पोलिस

प्रारब्धानुसार एखादा मनुष्य पोलिस होतो. पोलिसाचे निहित कर्म काय व त्याला पुण्य किंवा पाप कसे लागते याचा विचार आपण येथे करू.

गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करणे, गुन्हे घडू नयेत याविषयी दक्षता घेणे, सामान्य नागरिकांना दिलासा देणे, सर्वतोपरी मदत करणे हे पोलिसांचे व पोलिस अधिकाऱ्यांचे कर्तव्य होय. पोलिस हा समाजाचा मित्र व गुन्हेगारांचा कर्दनकाळ असला पाहिजे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला पोलिसाचा आधार वाटला पाहिजे, तर गुन्हेगारांना त्यांचा कर्दनकाळ वाटला पाहिजे. पोलिस खात्यातील सर्वांचे हे निहित कर्म आहे. जेव्हा पोलिस खात्यातील लोक याविरुद्ध वागू लागतात व गुन्हेगारांना जेव्हा संरक्षण देतात तेव्हा त्यांना फार मोठे पाप लागते व त्यांची अधोगती होते. अशा लोकांचा वृद्धापकाळ अतिशय वाईट जातो. शांती, समाधान त्यांना सोडून जाते, ते सतत बेचैन राहतात, त्यांची मुले गुंड प्रवृत्तीची बनतात. मृत्यूनंतर अशा लोकांची अधोगती होते.

जे पोलिस अथवा पोलिस खात्यातील लोक समाजाचे आशीर्वाद घेतात, समाजाला सहकार्य करतात, समाजाची सेवा करतात आणि गुन्हेगारीला आळा घालतात, पोलिस खात्यातील अशा सर्वांना मृत्यूनंतर स्वर्गलोक प्राप्त होतो. त्यांच्या कुटुंबीयांना व वंशजांना ईश्वराचे आशीर्वाद मिळतात.

## वकील

पीडित लोकांना न्याय मिळवून देणे, त्यांना सर्वतोपरी मदत करणे, अन्यायाचा प्रतिकार करणे, अन्यायाविरुद्ध कोर्टात

झगडणे, समाजकंटकांविरुद्ध लढा देणे हे वकिलाचे निहित कर्म होय. अशा प्रकारे वकिलांनी जर समाजसेवा केली, तर त्यांना फार मोठे पुण्य प्राप्त होते.

पण जर केवळ पैशासाठी वकील गुन्हेगारांना पाठीशी घालू लागले, तर त्यांना मोठे पाप लागते व हे पाप पुढे त्यांना हजारो वर्षे नरकयातना भोगण्यास भाग पाडते.

आजकालच्या वकिलांपैकी बरेचसे वकील पैशासाठी गुन्हेगारांना पाठीशी घालतात, गुन्हेगारांना संरक्षण देतात. त्यांच्या या कृत्याने त्यांना भरपूर पैसे मिळत असतील, पण मृत्यूनंतर अशा लोकांना खूप यातना भोगाव्या लागतात; तसेच पुढील अनेक जन्म त्यांना शिक्षा भोगाव्या लागतात.

परमेश्वराच्या दरबारात भूतकाळ व भविष्यकाळ असा प्रकार नसल्याने एखाद्या माणसाने कितीही गुन्हे केले किंवा पापे केली तरी ईश्वराला त्याचे काहीच वाटत नाही. एखाद्या माणसाने एक वर्षभर जर पाप केले, तर त्याची शिक्षा पुढे अनेक वर्षे भोगावी लागते. मानवाने आपल्या छोट्याशा आयुष्यामध्ये चुका करू नयेत, गुन्हे करू नयेत, पाप लागेल असे वागू नये यासाठी ईश्वर साधू-संतांद्वारा मानवांना नेहमी संदेश देत असतो.

# न्यायाधीश

गुन्हेगारांना योग्य ती शिक्षा देऊन गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालणे हे न्यायाधीशाचे निहित कर्म होय. हे निहित कर्म करताना एखाद्यावर अन्याय झाल्यास न्यायाधीशाला त्याचा दोष लागतो; तसेच एखाद्या अट्टल गुन्हेगारास संदेहाचा फायदा देऊन सोडून दिल्यास न्यायाधीशाला दोष लागतो, म्हणून न्यायाधीशाने पुरावे व वकिली जाबजवाब यावर अवलंबून न राहता, आपले अंत:करण काय म्हणते, आपली अंत:प्रेरणा काय सांगते याकडे अधिक लक्ष द्यावयास हवे. यासाठी न्यायाधीश म्हणून काम करणाऱ्या लोकांनी दररोज अर्धा ते एक तास ध्यान करणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे त्यांची अंत:प्रेरणा जागृत होऊन त्यांच्याकडून योग्य ते निर्णय दिले जातील. न्यायाधीश हा पृथ्वीतलावरील न्याय-निवाडा करणारा ईश्वरच असतो. ईश्वराने आपल्याला न्यायाधीशाची भूमिका दिली आहे, ती आपण यथायोग्य निभावणे आवश्यक आहे, याची जाणीव प्रत्येक न्यायाधीशाने ठेवणे आवश्यक असते.

ईश्वरी न्यायालयाच्या कटघऱ्यामध्ये आपल्याला उभे केले जाणार नाही, एवढी दक्षता न्यायाधिशाने जरूर घ्यावयास हवी.

## सत्ताधारी व अधिकारी

सरपंचापासून ते पंतप्रधानापर्यंत, शिपायापासून ते राष्ट्राध्यक्षापर्यंत प्रत्येकाने आपल्याला या पदावर ईश्वराने बसविले आहे असे समजून, आपले निहित कर्म चोख रितीने बजावून, समाधानाने जगावे अशी ईश्वराची अपेक्षा असते. हे निहित कर्म करताना कुणावर अन्याय होणार नाही, अधिकाराचा गैरवापर होणार नाही याची सतत दक्षता घ्यावयास हवी असते व अधिकाराचा वापर करताना गोरगरीबांवरती दया करणे अतिशय आवश्यक असते. गोरगरीबांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे हे यांचे प्रथम कर्तव्य असते.

या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून आजकालचे करवसुली अधिकारी सामान्य जनतेकडून करवसुली करत असताना मोठमोठे सत्ताधारी लोक अनैतिक मार्गाने अब्जावधी रुपये जवळ बाळगून असतात.

अशा प्रकारच्या वागण्याने या लोकांना पाप लागत असते व त्याचे परिणाम त्यांना मृत्यूनंतर भोगावे लागतात; परंतु या अधिकाऱ्यांना त्याची जाणीव नसते, म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याने तळागाळातील सर्वसामान्य माणसांचा प्रथम विचार करावा. सर्वसामान्य माणसांना माफक दरात अन्न, वस्त्र, निवारा व इतर जीवनावश्यक वस्तू मिळतील याची दक्षता घ्यावी. असे केल्याने

त्यांना जनता जनार्दनाचे आशीर्वाद मिळतील.

येथे एक गोष्ट मला आठवते –

एक अधिकारी सतत लोकांना त्रास देत असे. लोकांना दमदाटी करीत असे. दिवसातील एकही क्षण लोकांना दमदाटी केल्याशिवाय त्याचा जात नसे. अशी जेमतेम ५–७ वर्षे गेली असतील. तद्नंतर त्या अधिकाऱ्याला श्वासाचा विकार जडला. दोन पावले चालणे अथवा दोन शब्द बोलणे त्याला कठीण होऊ लागले. त्याच्याकडे पाहून लोक म्हणू लागले, ''सगळ्या लोकांना याने हैराण केले होते व आता स्वत: हैराण होत आहे.''

सर्व अधिकाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, त्यांना जे काही अधिकार प्राप्त झालेले आहेत ते ईश्वराने दिलेले आहेत असे त्यांनी मानावे व ईश्वराची सेवा म्हणून जनतेची सेवा करावी. करांचे ओझे उगाचच जनतेवर लादू नये. त्याऐवजी भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना व भ्रष्ट सत्ताधारी लोकांना वठणीवर आणावे. भ्रष्ट सत्ताधारी लोक समाजाचे रक्त शोषण करत असतात. अशा लोकांना हे कळत नाही की, वीस–तीस वर्षे ते समाजाच्या रक्ताचे शोषण करतात; परंतु त्याची शिक्षा त्यांना पुढे हजारो वर्षे भोगावी लागते.

सर्वसामान्य माणसांनी तसेच सत्ताधारी लोकांनी एक क्षण अंतर्मुख होऊन असा विचार करावा की, वाईटरितीने वागून पुढे हजारो वर्षे ईश्वरीशिक्षा भोगण्यापेक्षा दहा–वीस वर्षे चांगले

वागल्याने काय बिघडणार आहे; परंतु माणसाची कर्मे अशी असतात की, मनुष्य स्वार्थाने अंध बनतो व स्वार्थाने अंध झालेली माणसे स्वार्थासाठी वाटेल ते करत असतात. यातून सुटका व्हावी म्हणून साधू-संतांनी परोपकाराचा मार्ग सांगितला आहे. जे लोक परोपकाराचा मार्ग स्वीकारत नाहीत, त्यांना विविध प्रकारच्या ईश्वरीशिक्षांना तोंड द्यावे लागते.

या ईश्वरीशिक्षा सर्वसाधारणपणे कशा असतात यावर एक दृष्टिक्षेप टाकूया !

## एक

ध्यान करताना योग्याला विविध स्तरांमधून प्रवास करावा लागतो. अदृश्य सृष्टीतील या विविध स्तरांवरील आत्मे योग्याला त्या त्या स्तरावरची माहिती देतात. या ध्यानावस्थेमध्ये मी एक गडद अंध:कारमय लोक पाहिला. या लोकाच्या अधिपतीने मला विशेष संरक्षणात्मक कवच देऊन या अंधार कोठडीत फिरवून आणले. या कवचात असे सामर्थ्य होते की, या अंधारमय लोकातील लोकांना मी दिसत नव्हतो; परंतु तेथील सर्व वातावरण माझ्या ज्ञानदृष्टीला म्हणजे तृतीय नेत्राला दिसत होते. हा सर्व प्रवास मी सूक्ष्मशरीराने केला. ज्ञानी पुरुषाच्या किंवा योग्याच्या सूक्ष्मशरीराला तीन नेत्र असतात व हे सूक्ष्मशरीर अतिशय पवित्र असते. देवता व वातावरणातील सिद्ध आत्मे

अशा शरीराचे संरक्षण करीत असतात. याशिवाय अदृश्य सृष्टीतील प्रत्येक स्तरावर एक प्रमुख आत्मा असतो. हा प्रमुख आत्माही योग्याला सहकार्य करीत असतो.

अतिशय काळोख असणाऱ्या त्या स्तरामध्ये पूर्वकालीन अनेक सत्ताधारी आत्मे यातना भोगत आजही खितपत पडलेले आहेत. त्यातील काही आत्मे हजारो वर्षांपूर्वी संपूर्ण आशिया खंडावर राज्य करीत होते. अशा प्रकारे अनेक राजघराण्यांतील सत्ताधारी, अधिकारी; तसेच जमीनदार, धनाढ्य, व्याजाने पैसे देणारे सावकार, पूर्वीच्या काळी शेकडो गुलाम जवळ बाळगणारे अंमलदार, मजुरांना पिळणारे वतनदार; तसेच स्वार्थी, लोभी, कंजूष असे लक्षावधी आत्मे गेली हजारो वर्षे शिक्षा भोगत आहेत, त्यांच्या यातनांना अंत नाही. यातील काही आत्मे तर दहा हजार वर्षांहून अधिक काळ त्या नरकात यातना भोगत होते.

माझ्या मार्गदर्शक आत्म्याने मला सांगितले की, यातील काही सत्ताधारी लोकांची येथील शिक्षा संपल्यानंतर त्यांना ओझे वाहणाऱ्या जनावरांचे जन्म मिळतील. काही पापी आत्म्यांना तर तीस ते चाळीस वेळा ओझे वाहणाऱ्या जनावरांचे जन्म घ्यावे लागतील व तद्नंतर त्यांना दारिद्र्याने गांजलेल्या, काबाडकष्ट करणाऱ्या घराण्यात जन्म मिळतील. काही आत्मे तर जन्मत: अपंग, कुरूप व रोगग्रस्त जन्माला येतील, तर काही आत्म्यांना

जन्मल्यानंतर महारोग होईल, तर काही आत्मे भिकारी म्हणून जन्म घेतील.

## दोन

प्रत्येक व्यक्तीच्या कर्माप्रमाणे ईश्वराच्या दरबारात न्याय केला जातो. मानवतेला कलंक फासणारी राक्षसी कर्मे ज्यांनी केली आहेत, अशा लोकांना हजारो वर्षांच्या शिक्षा कशा होतात हे आपण पाहिले. त्याहून थोडे कमी दर्जाचे जे पापी असतात, म्हणजे जे स्वार्थी, लोभी, कंजूष असतात; तसेच पैसा खाणारे, लाच घेणारे असतात, अशा लोकांच्या शिक्षा त्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे आठशे ते हजार वर्षांत संपतात व नंतर त्यांना जंगलात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबात जन्म मिळतो. आठवड्यातून जेमतेम एक-दोन वेळा त्यांना अन्न खायला मिळते. अन्न-वस्त्राच्या अभावाने त्यांना खूप यातना सहन कराव्या लागतात. अनेक वर्षे अशा प्रकारे दारिद्र्य भोगल्याने त्यांच्या अंत:करणात एक प्रकारचा ओलावा निर्माण होतो, गरीबांविषयी दया निर्माण होते. हळूहळू त्यांच्यामध्ये परोपकारी वृत्ती निर्माण होऊ लागते व अशा रितीने सज्जनतेच्या दिशेने मानवाचा प्रवास सुरू होतो.

स्वत:ला अति शहाणे समजणाऱ्या तथाकथित सुशिक्षित, सत्ताधाऱ्यांनी, राजकारण्यांनी व अधिकाऱ्यांनी वरील सत्य वर्णन वाचून विचार करावा की, नि:स्वार्थ बुद्धीने व सज्जनतेने तीस-

चाळीस वर्षे नोकरी करून समाधानाने जगणे चांगले आहे की, गोरगरीबांना नाडून, त्यांचा शाप घेऊन, हजारो वर्षे ईश्वराच्या शिक्षा भोगणे योग्य आहे. यातील जे योग्य वाटेल त्या मार्गाचे सत्ताधाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी, स्वार्थी व कंजूष लोकांनी अनुसरण करावे.

## डॉक्टर

डॉक्टर या पेशामध्ये मानवतेची सेवा करून पुण्य मिळविण्याची भरपूर संधी उपलब्ध असते. या संधीचा फायदा डॉक्टर लोकांनी घेऊन जास्तीत जास्त पुण्य मिळवावे. डॉक्टर लोकांनी पैशावर दृष्टी ठेवू नये. डॉक्टरांचा पेशा रुग्णांच्या पैशावर चैन करण्यासाठी नसून, रुग्णांची सेवा करण्याकरिता आहे. याकरिता डॉक्टरांनी आवश्यक तेवढाच मोबदला घेऊन रुग्णांची सेवा करावी व पुण्य मिळवावे.

गरीबांना जितकी सवलत देता येईल तेवढी द्यावी. डॉक्टर जर अशा प्रकारे वागतील, तर मृत्यूनंतर त्यांना मानाचे स्थान प्राप्त होईल व त्यांच्या घराण्याला अनेक रुग्णांचे आशीर्वाद मिळतील.

## शिक्षक

समाजाची जडणघडण शिक्षकांच्या हातून होत असते.

शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी असते. मुलांना सुसंस्कृत करणे, सज्जन बनविणे हे शिक्षकांचे निहित कर्म होय. गत पन्नास वर्षांपासून भारतीय शिक्षक आपले हे निहित कर्म विसरलेला आहे फक्त पैशाच्या मागे लागलेला आहे. अर्थात याला केवळ शिक्षकच जबाबदार नसून, सरकारी धोरणही जबाबदार आहे; तरीपण ज्या शिक्षकांच्या वाचनामध्ये हा ग्रंथ येईल त्यांनी मुलांना शिकविण्याबरोबरच मुलांवर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकांनी मुलांना जर सुसंस्कृत बनविले, तर त्यांना पुण्य लाभते. या पेशात कुठेही पाप लागण्याचा संभव नसतो. इतका हा पेशा चांगला आहे.

## सोनार

असे म्हणतात की, एका सोनाराच्या पत्नीने सोन्याचे काम करीत असणाऱ्या आपल्या नवऱ्याकडे तुटलेली माळ जोडावयास दिली, तर त्या सोनाराने स्वत:च्या बायकोच्या माळेतील थोडेसे सोने चोरले. अर्थात सर्वच सोनार असे करतात असे नाही; पण फार पूर्वीच्या काळात होऊन गेलेल्या संत नरहरी सोनारानेही पांडुरंगावर अभंग करताना **'राम नाम सोने चोरी ।'** असे म्हटले आहे. यावरून त्या काळातील सोनार सोने चोरत असावेत.

हल्लीच्या काळातील सोनार काय करतात ते मला माहीत

नाही; परंतु मी जी काही सोनार घराणी पाहिली, त्यांच्या घराण्यात सद्‌बुद्धी आणि समाधान फारसे दिसून येत नाही. याचे कारण पूर्वजांची परंपरा हे असावे.

यापुढे तरी सुवर्णकार बंधूंनी मृत्यूनंतर आपले काय होईल याची थोडीफार जाणीव ठेवून वागावे व सोन्याचे अलंकार बनविणे हे जे आपले निहित कर्म आहे ते करताना सदैव ईश्वराची आठवण ठेवावी व मृत्यूनंतर सद्‌गती कशी प्राप्त होईल याकडे लक्ष ठेवावे व प्रायश्चित्त म्हणून नेहमी अन्नदान व धनदान करीत राहावे.

## सर्वसामान्य माणसे

सर्वसामान्य माणसे पाप करीत नाहीत; परंतु अनेक चुका करतात व या चुकांचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात. पुष्कळवेळा सर्वसामान्य माणसांच्या चुकांचे दुष्परिणाम त्यांच्या घराण्याला पिढ्यान् पिढ्या भोगावे लागतात.

मी स्वत: पाहिलेली काही उदाहरणे येथे देत आहे. त्यावरून सामान्य माणसे कशा चुका करतात व त्याचे दुष्परिणाम कसे होतात हे बघता येईल.

### एक

माझ्या प्रवासी जीवनामध्ये मी एक घराणे असे पाहिले की, त्या घराण्यातील पुरुष ६५ वय लागताच घर सोडून जातो व

कोठे जातो हे सांगत नाही व त्याचा पत्ता लागत नाही. असे का होते, हे कोणालाही समजत नाही. गेल्या कित्येक पिढ्या हा प्रकार त्यांच्या घराण्यात चालू आहे.

त्यांच्या नवव्या पिढीतील वंशजाने मला सांगितले, ‘‘सुमारे अडीचशे ते तीनशे वर्षांपूर्वी एक म्हातारा साधू आमच्या घरी भिक्षा मागावयास आला. आमच्या पूर्वजांनी त्याला भिक्षा न वाढता हाकलून लावले. जाताना तो म्हणाला की, ‘मी पासष्ट वर्षांचा म्हातारा आहे. आज माझी जी अवस्था आहे, तीच अवस्था तुझी वृद्धापकाळात होईल.’

तेव्हापासून आमच्या घराण्यातील प्रत्येक पिढीतील दोन-तीन माणसे पासष्टाव्या वर्षी घर सोडून निघून जातात. अशी बुद्धी का होते तेच कळत नाही.’’

**‘पिंडे पिंडे मतिर्भिन्न: ।’** माणसांच्या अंतरंगातील भिन्न-भिन्न प्रवृत्ती व भिन्न-भिन्न बुद्धी या त्यांच्या पूर्वीच्या अनेक जन्मांतील चांगल्या-वाईट कर्मानुसार निर्माण होत असतात व तद्नुसार तो वागत असतो. म्हणून **‘बुद्धिकर्मानुसारिणी: ।’** असे म्हटले जाते.

प्रारब्धाचे काही भोग हे भोगूनच संपवावे लागतात. याला अटळ प्रारब्ध असे म्हणतात. ईश्वरभक्तीने, साधू-संतांच्या मार्गदर्शनानुसार आणि सद्ग्रंथांच्या वाचनाने प्रारब्धामध्ये थोडाफार फेरफार करता येतो. प्रारब्धातील हा बदल मानवाच्या जीवनाला

एक नवीन दिशा देतो. यासाठी सतत ईश्वरभक्ती व सद्ग्रंथांचे वाचन करीत राहावयास हवे.

जितके शक्य होईल तितके मानवाने इतरांचे आशीर्वाद घ्यावेत व यासाठी प्रेमाने वागावे. अगदी घरच्या माणसांचेसुद्धा आशीर्वाद घेणे आवश्यक असते. कोणाचेही शाप घेऊ नयेत. याकरिता कोणाचीही मने दुखवू नयेत. पुष्कळवेळा घरच्याच माणसांबरोबर चुकीचे वागल्याने आपल्या जीवनात पुष्कळ प्रकारच्या समस्या व अडचणी निर्माण होऊ शकतात.अशी काही उदाहरणे मी स्वत: पाहिलेली आहेत. त्यातील दोन-चार उदाहरणे पुढे देत आहे.

## दोन

एकदा एका बहीण-भावाचे कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरामध्ये भावाने बहिणीला लाथ मारली.

या घटनेनंतर काही दिवसांनी त्या भावाचा पाय सुजला व कितीही उपचार केले, तरी तो बरा होईना. शेवटी त्याच्या पायात किडे पडले, पाय सडून गेला व या दुखण्यातच त्याला मृत्यू आला.

ही घटना कर्नाटकात घडलेली आहे. हा सर्व अति क्रोधाचा परिणाम होय.

## तीन

ही घटना सुमारे चाळीस–बेचाळीस वर्षांपूर्वीची आहे. त्या काळात माझे वय जेमतेम सहा–सात वर्षांचे होते. मी माझ्या एका नातेवाईकांकडे गेलो होतो. मी ज्यांच्याकडे गेलो तेथील वृद्ध प्रमुख अतिशय वृद्धपणामुळे अंथरुणावर पडून होते. त्यांचा मुलगा व सून त्यांना पोटभर खायला देत नसत. त्यांनी जास्त खायला मागितले की, ते त्यांच्यावर ओरडत असत. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर, ''साले माझ्याच घरात राहून मलाच खायला देत नाहीत! तुमचे कधीच भले होणार नाही,'' असे भाव असत. त्यांच्या मनातील विचार मला अतिशय चांगले कळत होते; पण सहा वर्षाच्या मुलाचे ऐकणार कोण?

असाच काही काळ गेला व ते वृद्ध गृहस्थ मरण पावले. या घटनेनंतर माझा व त्या नातेवाईकांचा जवळजवळ अडतीस वर्षे संबंध आला नाही. अडतीस वर्षांत त्यांची काही खुशाली कळली नाही.

अडतीस वर्षानंतर एका दैवी घटनेमुळे (काही आध्यात्मिक नियमानुसार या दैवी घटनेचा उल्लेख मला करता येत नाही.) त्या वृद्ध गृहस्थाची सून जी स्वत: आता साठ–बासष्ट वर्षांची वृद्ध झालेली होती, आपल्या सुमारे ३६–३७ वर्षांच्या मुलाला घेऊन माझ्याकडे आली.

त्या मुलाला पाहताच माझ्या लक्षात आले की, या मुलाच्या रूपाने त्या वृद्ध आजोबाने परत जन्म घेतला आहे. त्या वृद्ध स्त्रीला मी यापैकी काहीही सांगितले नाही व 'काय कसे काय चालले आहे?' असे विचारले.

ती वृद्ध स्त्री म्हणाली,"या मुलाने मला हैराण केले आहे. हा कुठला वैरी जन्माला आला आहे ते काही कळत नाही. याने वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षापासून आपल्या बापाने कमावलेली  सर्व संपत्ती उधळून टाकली. माझ्या अंगावरचे सुमारे शंभर तोळे सोने त्याच्या कारवायांमुळे विकावे लागले. त्याच्या आजोबांनी बांधलेले घर, ज्या घरात आम्ही सुखाने राहत होतो ते घर विकावे लागले व इतके सगळे होऊन अजूनही डोक्यावर कर्जाचे ओझे आहे व हा काहीही कमावित नाही. याच्या वागण्याने हैराण होऊन याचे वडील अतिशय काळजीने खंगून मेले. मी सध्या अतिशय हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढत आहे." आपली सर्व हकिकत सांगून तिने मार्गदर्शन करण्यास सांगितले.

मी त्या मुलाला विचारले, "तुझ्या आईने जे काही सांगितले यावर तुझे काय म्हणणे आहे?"

मुलगा म्हणाला, "मी आत्तापर्यंत अनेक धंदे केले; परंतु प्रत्येक धंद्यात माझे प्रचंड नुकसान झाले."

वस्तुतः खरी गोष्ट अशी होती की, सुनेने आपल्या

सासऱ्याला त्रास दिल्याकारणाने सासरा सुनेच्या पोटी मुलगा म्हणून जन्माला आला व आपल्या या जन्मातील आई-वडिलांची संपत्ती उधळून टाकली, जी पूर्वजन्मी त्यानेच कमावलेली होती.

त्याचा जन्म फक्त आई-वडिलांची संपत्ती उधळण्या करिताच झालेला होता. धंद्यात यश येण्यासाठी जे पुण्य आवश्यक असते तेवढे पुण्य त्याच्याकडे नव्हते, त्यामुळे त्याला कुठल्याच धंद्यात यश आले नसते. मी त्याला गाणगापूरच्या वाऱ्या करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने गाणगापूरच्या वाऱ्या केल्यानंतर त्याच्याकडे थोडीफार पुण्याई साचली व तो पोटापुरते मिळवू लागला.

वरील हकिकतीवरून एक गोष्ट लक्षात येते की, गाणगापूरसारख्या पवित्र तीर्थक्षेत्राच्या वाऱ्या केल्याने ज्याच्याजवळ अजिबात काही पुण्य नाही, अशा माणसाजवळ पुण्य साठू लागते व त्याला त्याच्या कार्यात, धंदा-उद्योगात यश प्राप्त होते, म्हणून सद्भाविकांनी नेहमी तीर्थयात्रा करत राहिले पाहिजे; तसेच श्री गुरुचरित्र, नवनाथ अशा पवित्र ग्रंथांचे वाचन नेहमी करत राहिले पाहिजे. श्री गुरुचरित्राचे सात सप्ताह अथवा नवनाथ ग्रंथाची अकरा पारायणे केली असता खूप दिव्य अनुभव येत असतात.

## चार

माझे एक मित्र अतिशय सज्जन होते. त्यांची पत्नी म्हणजे साक्षात् महालक्ष्मी होती. मित्राची आई आपल्या सुनेला खूप दु:ख देत असे व मित्राची पत्नी सर्व दु:ख सहन करून सर्वांना आनंद देत असे. स्वत: आनंदात राहायचे व इतरांना आनंद द्यायचा, असा तिचा स्वभाव होता. आपल्या सासू-सासऱ्यांना तिने कधीही नावे ठेवली नाहीत. बाहेरून येणाऱ्या कुणालाही सुनेच्या आनंदी स्वभावामुळे तिला काही त्रास आहे, असे वाटत नसे. घरातील वातावरण एकदम आनंदाचे दिसावयाचे.

या माझ्या मित्राला अनेक समस्या होत्या. मी त्याला सांगितले, ''तुझी आई तुझ्या पत्नीला त्रास देत आहे, तो बंद झाल्याशिवाय तुझ्या अडचणींचे निवारण होणार नाही. तुझी पत्नी साक्षात् महालक्ष्मी आहे, तिचा योग्य तो मान ठेवत जा ! तिला मान-सन्मानाची अपेक्षा नाही. तिच्यामध्ये सर्व दैवी गुण आहेत. मनुष्य गुण तिच्यात नाहीत, म्हणून तुझ्याकडून अथवा कोणाकडून तिची कसलीही अपेक्षा नाही. जरी असे असले तरी ती महालक्ष्मी अवस्थेची व्यक्ती असल्याने तुझ्या घरात तिचे जे अपमान होतात, त्या अपमानामुळे तुम्हाला पाप लागत आहे, म्हणून तुम्हाला सर्वत्र अपयश येत आहे, तरी तू तुझ्या जुनाट स्वभावाच्या आई-वडिलांना एखादी वेगळी खोली घेऊन दे व

तेथे त्यांची राहण्याची सोय कर, म्हणजे त्यांचाही मान राखला जाईल व तुझ्या पत्नीचाही अपमान होणार नाही.''

अनेक वेळा असे सांगितल्यानंतर त्या मित्राने माझे म्हणणे ऐकले व आई-वडिलांची वेगळी सोय करून दिली व त्यानंतर तो अतिशय सुखी झाला. त्याच्या डोक्यावरील जवळजवळ ३० लाखांचे कर्ज चमत्कारिकरित्या फिटले गेले व इतर ज्या काही समस्या होत्या त्याही सर्व सुटल्या व तो सर्व अर्थाने सुखी झाला.

पृथ्वीतलावर विविध प्रकारची माणसे राहत असतात. काही माणसे साक्षात् देवस्वरूप असतात. काही स्त्रिया साक्षात् देवी असतात. अशा देवी-देवतास्वरूप आत्म्यांचे अपमान झाले असता खूप मोठे पाप लागते. यासाठी शक्यतो कोणाचा अपमान करू नये व सर्वांचे आशीर्वाद घेत राहावे.

सर्वसामान्य माणसे फार मोठे पाप न करताही कर्मबंधनात कशी अडकतात त्याची कल्पना यावी म्हणून ही सर्व उदाहरणे दिली आहेत. यावरून वाचकांनी पुढील गोष्टी लक्षात घ्याव्यात.

१) परद्रव्य अथवा परवस्तू यांचा अपहार करू नये.

२) दुसऱ्याची इस्टेट अथवा दुसऱ्याचा जमीनजुमला गिळंकृत करू नये.

३) कोणाचेही नुकसान होईल, असे काही करू नये.

४) भिकारी समोर आल्यास त्याला काहीतरी फूल ना फुलाची पाकळी द्यावी; परंतु भिकाऱ्याला अपमानित करू नये.

५) परोपकार व दानधर्म करीत राहावे.

६) सतत ईश्वरभक्ती करीत राहावी.

७) एखाद्या मंत्राचा दररोज किमान ३६०० जप करावा.

८) कोणाचेही ऋण घेऊ नये व ऋण घेतल्यास ते लवकरात लवकर फेडून टाकावे. अन्यथा, ते फेडण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात व हजारो पटीने ते ऋण फेडावे लागते.

९) पाळता येत नसेल, तर कोणाला वचन देऊ नये.

१०) खोटे बोलणे, थापा मारणे, दुसऱ्यांना उल्लू बनविणे असल्या गोष्टी करू नयेत.

११) अधिकाराचा गैरवापर करू नये.

१२) लाच खाऊ नये.

१३) समाजाची सेवा करावी.

१४) तीर्थयात्रा कराव्यात.

१५) गोरगरीबांना मदत करावी.

१६) रोज थोडा वेळ ध्यान करीत जावे व मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करीत जावा.

सर्वसामान्य माणसाने इतक्या गोष्टी जाणीवपूर्वक केल्या, तर त्याला नक्कीच ईश्वराच्या दरबारात स्थान मिळेल.

ज्यांना समाजकंटक म्हटले जाते, म्हणजे जे लोक गुंडगिरी

करतात, लोकांना दमदाटी करतात, सज्जनांना त्रास देतात, खून-मारामाऱ्या करतात, अशा लोकांसाठी हे पुस्तक नसल्याने समाजातील अशा लोकांविषयी या पुस्तकात काहीही लिहिले नाही. अशा लोकांना मृत्यूनंतर हजारो वर्षे यातनालोकात काढावी लागतात व मनुष्य जन्माचा दुरुपयोग केल्याबद्दल त्यांना परत मनुष्यजन्म मिळत नाही.

सर्वसामान्य माणसे जरी फारसे पाप करीत नसतील, तरी त्यांनी पुरेसा दानधर्म व ईश्वरभक्ती केली नाही तर ते पिशाच्च सृष्टीत अडकून पडतात. गेल्या शंभर वर्षांत पिशाच्च सृष्टीमध्ये जाणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असून, स्वर्गलोकात जाणाऱ्या आत्म्यांचे प्रमाण दहा हजारांस एक असे आहे. सर्व जग सत्ता, संपत्ती, सौंदर्य व सामर्थ्य यांच्यामागे लागले आहे. आध्यात्मिक प्रगती कोणालाही नको आहे. याकरिताच ईश्वर सध्या अशा ग्रंथांची निर्मिती करीत आहे, जेणेकरून मानवास थोडेफार आध्यात्मिक मार्गदर्शन व्हावे.

मनुष्याने आध्यात्मिक व्हावे म्हणून अदृश्य सृष्टीतून फार जोरदार प्रयत्न सुरू आहेत. थोडीशी श्रद्धा ठेवली असता वातावरणातील देव-देवता खूप चांगले अनुभव देतात व श्रद्धा वाढवितात. याकरिता सर्वसामान्य लोकांनी एखाद्या देवतेवर श्रद्धा ठेवून तिच्या स्तोत्राचे हजारो पाठ करणे आवश्यक आहे. असे


केले असता ती देवता आपली संरक्षक देवता बनते, भक्ताला चांगले अनुभव देते व भक्ताचे सदैव रक्षण करते.

मनुष्य मनाने जेवढा निर्मळ, स्वच्छ, दानी, परोपकारी, मनमिळावू तितका तो ईश्वराच्या अधिक जवळ जातो. म्हणून फारशा शंका-कुशंका न करता, विकल्प न करता ईश्वरभक्ती करत राहावयास हवी.

बऱ्याच लोकांना मोठेपणाची खूप आवड असते. लोकांनी आपल्याला मोठेपणा द्यावा असे त्यांना सतत वाटत असते; तसेच काही लोकांना सतत इतरांवर अधिकार गाजविण्याची हौस असते, तर काही लोकांना इतरांवर डाफरत राहण्याची सवय असते. या सर्व गोष्टी दिसावयास अगदी सामान्य वाटत असल्या, तरी आध्यात्मिक प्रगतीला खूप अडथळे निर्माण करतात. यासाठी सामान्य मानवाने दररोज तास-दीड तास तरी एकांतात राहावे व आत्मचिंतन करावे. स्वत:तील दोष शोधण्याचा प्रयत्न करावा व दर वर्षी किमान एक दोष घालवायचाच असे ठरवून वागावे. असे केले असता आध्यात्मात प्रगती होईल.

# ३. श्रीमंती-गरिबी

## कालचक्र




कालचक्र फिरत असते; प्रत्येक कुटुंबामध्ये श्रीमंतीमागून गरिबी व गरिबीमागून श्रीमंती असे प्रकार होत असतात. जे लोक अति

श्रीमंत असतात अशा अति श्रीमंतांपैकी काही लोकांना संपत्तीचा गर्व होतो. पैशाच्या बळावर आपण वाटेल ते करू शकतो, असे त्यांना वाटू लागते. अशा लोकांची एकदा घसरगुंडी सुरू झाली की, त्यांच्या  घराण्याला अतिशय दारिद्र्य येते. अशी घराणी मग बरीच वर्षे दारिद्र्यात खितपत राहतात.

वैकुंठाच्या बँकेमध्ये जोपर्यंत पुण्याई शिल्लक आहे तोपर्यंत मानवाला पैसा विविध मार्गांने मिळत राहतो व जसजसे पुण्य संपत येईल तसतसे उद्योगधंदे बंद पडू लागतात. धंद्यात तोटा होऊ लागतो. सर्व बाजूंनी नुकसान होऊ लागते. कोर्ट-कचेऱ्या होऊन संपत्ती व स्थावर-जंगम मालमत्ता सील होते. मालमत्ता असूनही ती विकून पैसे मिळविता येत नाहीत. या सर्व गोष्टी पुण्याई संपत आली की सुरू होतात.

ज्याप्रमाणे आपल्याला इन्कम टॅक्स भरावा लागतो व तो न भरल्यास दंड व शिक्षा होते; तसेच सरकार कराची थकबाकी व्याजासहित वसूल करते, त्याचप्रमाणे ईश्वराचा नियम असा आहे की, तुम्ही मिळविलेल्या उत्पन्नापैकी वीस टक्के रक्कम दानधर्मात खर्च केली पाहिजे व तशी खर्च न केल्यास ईश्वर भरमसाठ व्याजाने ती रक्कम वसूल करतो आणि वर दारिद्र्य आणि मूढता यांची शिक्षा त्या घराण्याला होते.

मनुष्य जेव्हा कोट्याधीश होतो किंवा कोट्यावधी रुपयांची मालमत्ता करतो, तेव्हा वीस टक्के रक्कम दानधर्मात खर्च करणे

त्याला शक्य होत नाही. संपत्तीचा मोह त्याला तसे करू देत नाही व परिणामी त्याची थकबाकी प्रचंड प्रमाणात वाढते व नंतर विविध प्रकारच्या ईश्वरीशिक्षा सुरू होतात. वैकुंठाच्या बँकेमध्ये जोपर्यंत पुण्याई शिल्लक आहे तोपर्यंत सर्व काही निर्विघ्नपणे पार पडत राहते. पुण्याई संपल्यानंतर सत्ताधारी माणसाच्या हातून सत्ता जाते. श्रीमंताच्या घरून लक्ष्मी निघून जाते. सामर्थ्यवान व्यक्तीचे सामर्थ्य नष्ट होते. बुद्धिमान व्यक्तीची बुद्धी भ्रष्ट होते. कलाकाराच्या कलेला कोणी विचारत नाही. ज्ञानी व्यक्तीच्या ज्ञानाला काही किंमत राहत नाही. अशा प्रकारे पुण्याई संपल्यानंतर मनुष्य सर्व बाजूंनी अगतिक होतो. याकरिता प्रत्येक मनुष्याने सतत पुण्य वाढवीत राहणे आवश्यक असते.

एखादी व्यक्ती M.B.B.S. पर्यंत शिकून डॉक्टर होते. इथे त्याचे पुण्य संपते व डॉक्टर झाला पण दवाखाना चालत नाही, अशी त्याची अवस्था होते. याला कारण M.B.B.S. ची परीक्षा पास होईपर्यंत पुण्याई पुरली व तेथेच त्याची पुण्याई संपली. उद्योग-धंद्यात यश येत नाही, म्हणून कितीतरी जण अनेक प्रकारचे उपाय करत असतात; परंतु स्वत:ची पुण्याई वाढविण्याचा प्रयत्न कोणीही करत नाही. पुण्याई वाढली की, सर्व समस्या आपोआप सुटत असतात.

पुण्याई वाढविण्याचे अनेक मार्ग आहेत. गोरगरीब,

अनाथ-अपंग यांना मदत करणे, गोरगरीबांच्या औषधोपचारांची व शिक्षणाची सोय करणे, गोरगरीबांच्या लग्नकार्यात मदत करणे, शाळा-कॉलेज-हॉस्पिटल्स काढणे, गोरगरीबांना अन्न, वस्त्र व निवारा यांची सोय करून देणे, धर्मशाळा बांधणे, नदीला घाट बांधणे, पाणपोई निर्माण करणे, अशा विविध मार्गांनी पुण्य निर्माण करता येते. इतकेच नव्हे तर वड, औदुंबर, पिंपळ अशी झाडे लावणे व त्या झाडांचे संगोपन करणे हेसुद्धा बिनखर्चाचे; परंतु भरपूर पुण्य मिळवून देणारे सत्कर्म आहे. प्रत्येक मनुष्याने १०८ औदुंबराची, १०८ वडाची व १०८ पिंपळाची झाडे लावावीत. याने खूप पुण्य प्राप्त होते, तसेच चिमण्या, कावळे, कुत्रे, गायी यांना खाऊ घालावे, यानेही पुण्य प्राप्त होते. याशिवाय एखाद्या स्तोत्राचे अनेक पाठ करावेत; तसेच दररोज किमान ३६०० जप करावा. यानेही पुण्य प्राप्त होते. कुमारी पूजन, होमहवन, अन्नदान, तीर्थयात्रा या सर्व गोष्टी मानवाला पुण्य मिळवून देतात.

अशा प्रकारचे पुण्य मिळविण्याचे हजारो मार्ग आहेत. पुष्कळवेळा असे घडते की, एखाद्या गरीबाने एक रुपया दान केल्याने जेवढे पुण्य त्याला मिळते त्यापेक्षा कितीतरी पटीने कमी पुण्य श्रीमंताला एक लाख रुपये दान करून मिळते. ईश्वराचा हा हिशेब मानवी बुद्धीला जरी पटणारा नसला, तरी अनेक कारणांनी तो बरोबर असतो. त्यातील काही कारणे पुढील प्रमाणे :-

१) दहा कोटी रुपयांची मालमत्ता जवळ बाळगून एखादा

श्रीमंत दहा लाख रुपयांचे जेव्हा दान करतो, तेव्हा टक्केवारीच्या हिशेबाने त्याने फक्त एक टक्का दान केलेले असते. याशिवाय काही श्रीमंतांच्या मनामध्ये अनेक विकृती असतात. या विकृतीमुळे एक टक्का दानाचे पुण्यही त्याबरोबर मिळत नाही, त्यामुळे त्याच्या पदरात जेमतेम एक दशांश टक्का एवढेच पुण्य पडते. एखादा गरीब त्याची परिस्थिती नसतानाही अत्यंत स्वच्छ व उदार मनाने जेव्हा एक रुपयाचे दान करतो तेव्हा त्यालाही ईश्वरी नियमाप्रमाणे एक टक्का पुण्य मिळत असते; परंतु ही एक टक्का पुण्याई एक वर्ष त्याच्या चरितार्थाला उपयोगी पडते.

श्रीमंताची भूक मोठी, हाव मोठी, व्याप मोठा व संताप पण मोठा.

श्रीमंती आणि गरिबी ही कालचक्रानुसार येत-जात राहते. कालचक्राच्या हिशेबानुसार दर ७५ वर्षांनी घराण्याला श्रीमंती येते, ती सुमारे २०-३० वर्षे टिकते, नंतर उतरती कळा लागते. या काळात सत्कर्म करून जर पुण्य संपादन केले, तर मध्यम स्थितीत वीस-तीस वर्षे जातात व पुन्हा श्रीमंती येते; पण काहीच पुण्य केले नाही, तर दारिद्र्य येते व ते जवळजवळ ६० वर्षे टिकते. अशा प्रकारे श्रीमंती-गरिबीचे चक्र अनादी कालापासून चालू आहे.

वाईट मार्गाने कधीही पैसा मिळवू नये. वाईट मार्गाने मिळविलेला पैसा फार काळ टिकत नाही व तद्नंतर येणारे

दारिद्र्य मात्र भयंकर असते.

आपण जर सतत सत्कर्म करीत राहिलो, तर ईश्वर आपले संरक्षण करतो व सर्व प्रकारच्या आपत्तींमध्ये आपले संरक्षण होत राहते.

सर्वसाधारण मनुष्याचा स्वभावच असा असतो की, त्यांना ईश्वरभक्ती, परोपकार, इतरांना मदत करणे, दान, सहानुभूती, करुणा इत्यादी गोष्टींची कधी आठवण होत नाही; परंतु तो जेव्हा अडचणीमध्ये, कष्टामध्ये, दुःखामध्ये किंवा दारिद्र्यामध्ये सापडतो, तेव्हा त्याला ईश्वराची आठवण येते. लोकांनी आपल्याला सहानुभूती दाखवावी, दया दाखवावी, मदत करावी असे त्याला वाटू लागते. बरीच वर्षे दुःख, कष्ट व यातना भोगल्यानंतर व ईश्वरभक्ती केल्यानंतर हळूहळू त्याला ईश्वरीकृपेचा अनुभव येऊ लागतो व तो सन्मार्गाने चालावयास सुरुवात करतो. अशा प्रकारे अनेक वर्षे गेल्यानंतर तो खऱ्या अर्थाने सद्भक्त व सात्त्विक बनतो. हळूहळू त्याचे कष्ट दूर होतात, दारिद्र्य दूर होते व तो पुनश्च सुखी होतो. त्याच्यातील अहंकार व दर्प निघून गेलेले असतात.

# ४. प्रकाशमार्ग व अंधारमार्ग

## मानवाला सुधारण्यासाठी दोन मार्ग आहेत

### पहिला मार्ग

ईश्वरभक्ती, दानधर्म, परोपकार अशा प्रकारे मानवतेचे आचरण करून, सन्मार्गाने वागून मनुष्य स्वत:चा उद्धार करून घेऊ शकतो. या मार्गामध्ये माणसाला फारसे कष्ट होत नाहीत; तसेच त्याचे पुढील जन्म अतिशय सुखाचे जातात व नैसर्गिकरित्या ऐहिक व आध्यात्मिक उन्नती होत राहते. या पहिल्या मार्गाला प्रकाशमार्ग किंवा धवलमार्ग असे म्हणतात. या प्रकाशमार्गाने पुढे चालत असता शांती, दया, प्रेम, सहानुभूती, भूतदया इत्यादी सद्गुणांच्या पायऱ्या चढत सद्भक्त साधक होतो व त्याला संजीवन समाधी अवस्था प्राप्त होते.

## दुसरा मार्ग

या दुसऱ्या मार्गाला तामसमार्ग असे म्हणतात. हा मार्ग अंधाराचा आहे. पृथ्वीतलावरील लाखातून एखादा मनुष्य प्रकाशमार्गाने जातो. बाकी सर्व तामसमार्गाने जात असतात.

या दोन मार्गांहून तिसरा मार्ग पृथ्वीतलावर अस्तित्वात नाही. या दोन मार्गांत सर्व मार्ग अंतर्भूत झालेले आहेत. प्रकाशमार्गाचे दर्शन होणे सामान्य माणसाला कठीण असते. इतकेच नव्हे तर मोठमोठे चमत्कार करणारे साधूही या तामसमार्गाने जात असतात. या तामसमार्गावर एक छोटासा दृष्टिक्षेप आपण या प्रकरणात टाकू.

## तामसमार्गीय सामान्य माणसे

तामसमार्गीय सामान्य माणसाच्या मनामध्ये स्वत:ला सुधारण्याचा विचार कधीही येत नाही. आपल्याला खूप काहीतरी कळत आहे, असा अहंकार त्याच्यामध्ये असतो. यातील जे लोक घोर अंध:कारात बुडालेले असतात, असे लोक काहीही कामधंदा करू शकत नाहीत व पोट भरण्यापलीकडे त्यांना काहीही सुचत नाही व समजत नाही. जे लोक आयुष्यभर फक्त पोट भरण्यासाठी काबाडकष्ट करतात, ईर्षा, द्वेष, मत्सर, क्रोध, खून, मारामाऱ्या, दंडेलशाही, दडपशाही, गुंडगिरी करतात, असे लोकही या घोर तामसमार्गातीलच असतात.

जे लोक काबाडकष्ट करून जगतात व काबाडकष्ट करताना दुष्प्रवृत्ती, दुष्ट विचार यांच्या आश्रयाने राहतात, खूप स्वार्थ करतात, जे स्वार्थापलीकडे कसलाही विचार करत नाहीत, जे सतत नाटके करत राहतात, जे क्वचितच खरे बोलतात, जे दिखावा करतात, जे आत एक बाहेर एक असे वागतात असे सर्व लोक तामसमार्गी होत.

## तामसमार्गी साधू

जे भूत–प्रेतांची साधना करतात, भूत–प्रेत, वेताळ, झोटिंग अशा साधना करून पिशाच्च शक्तींना वश करून घेतात व त्याद्वारे समाजामध्ये स्वत:चा धाक जमवितात असे सर्व लोक तामसमार्गी साधक होत. हे तामसमार्गी साधक अनेक प्रकारचे चमत्कार करू शकतात. चमत्कार तेथे नमस्कार या न्यायाने असंख्य लोक यांचे भक्त असतात. पिशाच्च विद्येद्वारे हे लोक माणसाचा भूतकाळ अचूक सांगू शकतात व नजीकच्या भविष्यकाळात घडणाऱ्या घटनाही ते सांगू शकतात. पिशाच्चबाधा निवारण करणे, रोग–व्याधी यांचे हरण करणे,अशी अनेक कामे यातील काही जे सज्जन आहेत असे लोक करतात; परंतु काही कारणाने जर यांचे बिनसले, तर ते एखाद्याचे वाईटही करतात; तसेच एखाद्यावर अन्यायही करतात. पुष्कळवेळा यांच्या हातून निरपराध व्यक्तींवर अन्याय होतो.

तामसमार्गी साधक जर स्वार्थी, धूर्त व कपटी लोकांच्या हातात सापडला, तर अशा साधकाची जीवनाची दिशाच बदलून जाते. त्याच्या हातून अन्याय व अधर्म होतात व मृत्यूनंतर फार मोठ्या ईश्वरीशिक्षांना तोंड द्यावे लागते.

तामसमार्गाने साधनामार्गात पुढे गेलेल्या एखाद्या साधकाला त्याच्यातील सज्जनतेमुळे किंवा परोपकारी स्वभावामुळे प्रकाशमार्गाची दिशा मिळते व तामसमार्ग सोडून देऊन तो प्रकाश मार्गाचा साधक होतो. यासाठी त्याला तामसमार्गाने मिळविलेल्या सर्व सिद्धी सोडाव्या लागतात व परोपकार, करुणा, प्रेम व मानवता यांचे आचरण करावे लागते.

याकरिता सामान्य मानवाने परोपकार, प्रेम व दान यांची कास पहिल्यापासून धरल्यास हळूहळू तो प्रकाशमार्गाकडे खेचला जाईल व तामसमार्गातून त्याची सुटका होईल. लिहिण्यापुरते हे जरी खरे असले, तरी वातावरणामध्ये इतक्या काही तामसमार्गीय शक्ती भरलेल्या आहेत की, त्या मानवाला सद्‌बुद्धी होऊ देत नाहीत. या शक्ती सतत मानवाला खाली खेचत असतात. अनेकांनी उपदेश करूनही, अनेक चांगली पुस्तके वाचूनही इतकेच नव्हे, तर उच्च कोटीच्या सत्पुरुषांच्या सहवासात राहूनही वातावरणातील या दुष्ट शक्ती मानवाला खाली खेचत असतात.

मानवाची अधोगती व्हावी म्हणून वातावरणातील या दुष्ट शक्ती मानवाच्या मनामध्ये क्रोध, लोभ, स्वार्थ व अहंकार

निर्माण करतात. काही दुष्ट शक्ती तर याहून भयानक अशा प्रवृत्ती माणसाच्या मनात निर्माण करतात. अशी माणसे सत्तापिपासू बनतात व कपट नीती, कुटील नीती यांचा आश्रय करतात. अशा माणसांना माणसे म्हणणेही चुकीचे ठरते. कपट नीती, सत्तापिपासू वृत्ती, कुटील नीतीने वागणाऱ्या लोकांना जिवंत पिशाच्च म्हटले जाते. अशी माणसे स्वत: अधोगतीला जातात व आपल्याबरोबर अनेकांना अधोगतीला नेतात.

तामसमार्गीय साधू असो, अथवा सामान्य मनुष्य असो, यांच्या मनाला शांती कधीच प्राप्त होत नाही. कर्मगतीच्या नियमानुसार तामसमार्गीय लोकांना अनेक प्रकारच्या ईश्वरीशिक्षा भोगाव्या लागतात. अनेक प्रकारचे क्लेश व कष्ट भोगावे लागतात. पुष्कळवेळा हे क्लेश व कष्ट अनेक पिढ्यांपर्यंत चालत राहतात. तामसमार्गीय मानवाच्या मनात प्रेमाचा ओलावा निर्माण व्हावा म्हणून ईश्वर त्याच्या हृदयावर सारखे आघात करत असतो; परंतु मानवी मनातील अहंकार हृदयामध्ये प्रेमाचा पाझर फुटू देत नाही. याशिवाय जन्मोजन्मींचे कर्मप्रारब्ध सारखे आडवे येत राहते, त्यामुळे अंत:करणात ईश्वरभक्ती निर्माण होण्याऐवजी तामसमार्गी मनुष्य आपल्या दु:ख- कष्टांवर तोडगे शोधण्यासाठी तामसमार्गीय साधूकडे जातो.

अशा प्रकारे या मायाचक्रामध्ये मनुष्य सतत वाहत राहतो.

मनुष्यामध्ये जेव्हा परोपकाराची भावना निर्माण होते, तेव्हा तो तामसमार्गाच्या चक्रातून बाहेर पडू लागलेला असतो. या परोपकारी जीवनामध्येसुद्धा तामसमार्गीय आत्मे त्याची अनेकदा फसवणूक करतात. पुन्हा त्याला तामसमार्गाकडे खेचण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु परोपकाराचे पुण्य त्याचे रक्षण करीत राहते. ईश्वराची भक्ती त्याला तारत राहते. वीस-पंचवीस वर्षे अशा प्रकारे परोपकार व ईश्वरभक्ती करीत राहिल्यानंतर ईश्वरीकृपेने त्याला हंसमार्गाचे म्हणजे धवलमार्गाचे म्हणजेच प्रकाशमार्गाचे ज्ञान होऊ लागते व असा साधक नंतर प्रकाशमार्गाने वाटचाल करू लागतो.

पुष्कळवेळा असेही घडते की, एखाद्या प्रकाशमार्गी सत्पुरुषाच्या दर्शनाने व सहवासाने सेवा करण्याची, दान करण्याची, परोपकार करण्याची सद्बुद्धी मानवामध्ये उत्पन्न होते; परंतु पूर्वजन्मातील पापकर्मे त्याला तामसमार्गात खेचून नेतात. त्याला त्या सत्पुरुषाजवळ राहू देत नाहीत. तामसमार्गातील पिशाच्च या भक्ताच्या मनात निरनिराळी प्रलोभने निर्माण करतात व ही प्रलोभने शेवटी मनात लोभ निर्माण करतात. लोभाबरोबर ईर्षा, द्वेष, मत्सर, हेवेदावे असे दुर्गुण निर्माण होतात. सत्पुरुषांच्या सहवासाने निर्माण झालेले सद्गुण निघून जातात व तामसमार्गाच्या खोल गर्तेत हा भक्त बुडून जातो. हजारो वर्षांनंतरही अशा माणसांना पुनश्च

मनुष्यजन्म मिळत नाही व हजारो वर्षे प्रकाशमार्गाचे दर्शनही होत नाही. प्रकाशमार्ग व अंधारमार्ग कसे असतात व प्रकाशमार्गातून मनुष्य अंधारमार्गाकडे कसा जातो व अंधारमार्गातून प्रकाशमार्गाकडे कसा जातो हे पुढील चित्रावरून कळून येईल.



समजा एखादा मनुष्य अंधारमार्गात खितपत पडलेला आहे. अनेक कष्ट व दु:ख भोगल्याने, अनेक यातना सहन केल्याने, किंवा एखाद्या सत्पुरुषाच्या सहवासाने त्याच्या मनाला ईश्वरभक्ती करण्याची व थोडाफार परोपकार करण्याची सद्‌बुद्धी झाली आहे, तर असा मनुष्य प्रकाशमार्गाकडे हळूहळू खेचला जातो व एक-दोन जन्मांनंतर तो प्रकाशमार्गात येऊन स्थिरावतो. दान, ईश्वरभक्ती व ईश्वरसेवा याबरोबरच जर नि:स्वार्थ बुद्धीची कास धरली, तर आध्यात्मात वेगाने प्रगती होते व प्रकाशमार्गात लवकर प्रवेश होतो.

समजा एखादा मनुष्य तामसमार्गामध्ये आहे व एखाद्या सत्पुरुषाने त्याला खेचून प्रकाशमार्गात आणण्याचा प्रयत्न केला; स्वत:ची पुण्याई व तपस्येचा भाग खर्च करून प्रकाशमार्गात आणले व या भक्ताने जर स्वार्थ, लोभ, अहंकार, सत्पुरुषाला

फसविणे अशा गोष्टी केल्यास तो पुनश्च तामसमार्गाकडे खेचला जातो. अशा प्रकारे सद्गुणविरहित मनुष्याला जरी सत्पुरुषाच्या कृपेने प्रकाशमार्ग मिळाला, तरी सद्गुणांच्या अभावामुळे तो पुन्हा तामसमार्गाच्या गर्तेत पडतो.

मी स्वत: अनेक माणसांना केवळ प्रेमापोटी या प्रकाशपथावर खेचून आणून टिकविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या पिशाच्च प्रवृत्तींनी त्यांना परत तामसमार्गाकडे खेचून नेले.

काही तामसमार्गीय साधूंनी तर माझ्यातील शक्ती खेचून घेतली. त्यांनी दहा मिनिटात जेवढी शक्ती खेचून घेतली ती परत मिळविण्याला मला बरेच दिवस लागले. सज्जन सद्भक्तांनी साधूंकडे जाताना ते कसे आहेत याचा नीट विचार करून मगच जावे; अन्यथा नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. यापेक्षा दानधर्म, परोपकार व ईश्वर नामस्मरण भरपूर करत राहावे म्हणजे एक दिवस उद्धाराचा मार्ग जरूर मिळेल.

मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांमध्ये तामसमार्गीय साधू बरेच आढळून येतात. यातील अघोर पंथी तर फारच विचित्र असतात. प्रेतावर बसून जप करणे, प्रेताचे मांस खाणे असले भयानक प्रकार ते अघोर पंथी साधू करत असतात. हे लोक वर्षानुवर्षे स्मशानात राहून साधना करतात. साधनेसाठी यांना स्मशानही जागृत लागते. ज्या स्मशानामध्ये दररोज प्रेत

जाळले जाते अथवा पुरले जाते त्या स्मशानाला जागृत स्मशान असे म्हणतात आणि असे स्मशान जर बारा महिने वाहणाऱ्या नदीच्या किनारी असेल, तर ते अधिक शक्तिशाली मानले जाते. अशा जागेमध्ये साधना करून अघोर पंथीय साधक काळ्या विद्येची उपासना करतात व विविध प्रकारच्या शक्ती प्राप्त करतात. अर्थात या शक्ती क्षुद्रशक्ती असतात. या क्षुद्रशक्तींच्या आधाराने असे साधक समाजाला आपल्या मुठीत ठेवू शकतात. ईश्वर, भक्तिमार्ग, आध्यात्म यांना सतत नावे ठेवणारे नास्तिक लोकही अशा साधूंच्या बाबतीत काहीही करू शकत नाहीत. उलट अशा साधूंना सगळेच भिऊन राहतात. राजकारणी व सत्ताधारी लोकांना तर असे साधू हवे असतात; परंतु परमेश्वराच्या दरबारात अशा लोकांना काहीही स्थान नसते. हा मार्गच असा आहे की, या मार्गातील साधू व त्याला भजणारे त्याचे सर्व भक्त यांची पराकोटीची अधोगती होते व हजारो वर्षे त्यांना सन्मार्ग प्राप्त होत नाही. मृत्यूनंतर अशा सर्वांची अंधारलोकात रवानगी होते, जेथील अंधार अतिशय भयंकर असतो. अशा काळ्याकुट्ट अंधारलोकामध्ये आठ ते दहा हजार वर्षे काढावी लागतात व अनेक प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात. म्हणून सामान्यजनांनी या अघोर पंथाच्या नादाला कधीही लागू नये. यातील कित्येक साधू स्वतःला 'अवधूत' म्हणवून घेतात; परंतु अवधूत या शब्दाचा अर्थही त्यांना माहीत नसतो. अवधूत म्हणजे पाप

धुणारा.

वैज्ञानिक भाषेत सांगायचे म्हणजे आपल्या महाकारणदेहातील अत्यंत सूक्ष्म व अत्यंत पवित्र अशा किरणांनी जो इतरांची सूक्ष्म शरीरे धुतो व आपल्यातील तेज त्यांना प्रदान करतो अशा योग्यांना अवधूत योगी म्हटले जाते. असे योगी समाजात राहत नाहीत, एकांतवासात गुप्तपणे राहून साधना करत असतात व क्वचितच भाग्यवंतास दर्शन देतात.

अशा अवधूतांच्या कृपेने पाप, ताप व दैन्य नष्ट होते; परंतु असे महात्मे भेटणे अतिशय कठीण असते व भेटल्यास त्यांच्यावर श्रद्धा बसणे कठीण असते. श्रद्धा बसल्यास आज्ञापालन कठीण असते; परंतु अशा सिद्धपुरुषांच्या दर्शनाने खूप पुण्य मिळते. एवढे मात्र खरे !

## पुण्यप्रभाव

आजकाल लोक क्रेडिट कार्ड जवळ बाळगतात. हे क्रेडिट कार्ड जवळ असले की, तुम्ही कुठल्याही दुकानात जाऊन काहीही खरेदी करू शकता.

एका विशिष्ट बँकेमध्ये तुम्ही काही ठराविक रक्कम भरल्यानंतर तुम्हाला क्रेडिट कार्ड मिळते व हे क्रेडिट कार्ड घेऊन संपूर्ण जगात कोठेही तुम्ही फिरू शकता व काहीही खरेदी करू शकता.

पुण्य म्हणजे अदृश्य सृष्टीतील क्रेडिट कार्ड होय ! तुम्ही तुमच्या अनेक पूर्वजन्मांमध्ये जी काही चांगली सत्कर्मे केली असतील, परोपकार, दानधर्म केला असेल, त्याचे फळ म्हणून ईश्वराच्या बँकेमध्ये तुमच्या नावाने पुण्य जमा होते व या पुण्याईचे फळ तुम्हाला पुढील जन्मात मिळत असते.

या जन्मामध्ये तुम्हाला जे काही सुख प्राप्त होत असते, ते सर्व तुमच्या पूर्वजन्मातील पुण्याईचे फळ होय. हे सुख भोगत असतांना ईश्वराच्या बँकेतील पुण्य कमी-कमी होत जाते. याकरिता सतत पुण्याई वाढवत राहावयास हवी. या जन्मात मिळणारे सुख हे पुण्याईचे फळ जरी असले, तरी आपल्या रोजच्या जीवनामध्ये आपण जे काही सुख भोगतो, ते सुख भोगत असताना पुण्याई खर्च होत असते. जेव्हा पुण्याईचा रिझर्व्ह लागतो तेव्हा आपल्याला संकटे, आपत्ती व अपयश यांना तोंड द्यावे लागते. येथेच जर मनुष्य सावध झाला नाही, तर सर्व पुण्य संपते व जीवन दु:खमय व कष्टमय होते, उद्योगधंदे बंद पडतात, नोकरी मिळेनाशी होते, नोकरी असल्यास ती सुटते, दोन वेळचे अन्न मिळणेही कठीण होते. अशा अनेक प्रकारच्या दु:खकारक, क्लेशकारक गोष्टी जीवनामध्ये पुण्याई संपल्यानंतर घडतात. (मोटारसायकलच्या पेट्रोलच्या टाकीत एक छोटासा कप्पा असतो, त्याला रिझर्व्ह असे म्हणतात. टाकीमधील पेट्रोल पूर्ण संपले की, मोटारसायकल गचके देऊन बंद पडते तेव्हा हा रिझर्व्ह चालू करून मोटारसायकल

चालविता येते; त्याचप्रमाणे पुण्याई संपत आली की, आपत्ती येतात.)

पुण्य व त्याचा प्रभाव हा विषय इतका सूक्ष्म आहे की, याविषयी सविस्तर व मुद्देसूद लिहिणे अतिशय कठीण आहे. कारण या विषयात गुंतागुंत फार आहे, तरीपण काही उदाहरणे देऊन पुण्याईचा प्रभाव कसा असतो यावर एक दृष्टिक्षेप टाकू.

एखाद्या मनुष्याची व्यापारात भरभराट होते, हा त्याच्या पूर्वजन्मातील पुण्याईचा प्रभाव असतो. भरभराटीची पाच-सात वर्षे गेल्यानंतर त्या व्यक्तीला आपण खूप मोठे कर्तबगार आहोत, असे वाटू लागते. ही भरभराट म्हणजे आपल्या पूर्वजन्मातील पुण्याईचा प्रभाव आहे, हे तो विसरतो. मिळालेल्या उत्पन्नातून काही भाग दानधर्मात खर्च करून पुण्य वाढवत राहिले पाहिजे, हेही तो विसरतो. लोभ व स्वार्थ त्याच्यात वाढू लागतात. असे करता करता पंधरा-वीस वर्षे निघून जातात व नंतर व्यापारात नुकसान व्हावयास सुरुवात होते. आपले पुण्य संपले आहे व त्यामुळे धंदा-उद्योगात नुकसान होत आहे हे मानवाच्या कधीही लक्षात येत नाही; कारण हे लक्षात येण्यासाठी खूप मोठ्या ईश्वरीकृपेची आवश्यकता असते. फार मोठ्या सात्त्विक पुण्याईची आवश्यकता असते. अशा प्रकारची सात्त्विक पुण्याई दहा लाखांतील एखाद्या व्यक्तीजवळही असणे कठीण असते.

मनुष्य जन्माला आल्यापासून मरेपर्यंत प्रतिक्षणाला पुण्याई

खर्च होत असते व तद्नुसार जीवनात चढ-उतार, यश-अपयश, सुख-दु:ख, लाभ-हानी, रोग-आरोग्य इत्यादी गोष्टी घडत असतात.

मी स्वत: पाहिलेली काही उदाहरणे पुढे देत आहे, त्यावरून एखाद्या व्यक्तीची पुण्याई अचानक कशी संपते व पुढे त्याला कसे धक्के खावे लागतात याची माहिती वाचकांना होईल.

Mr. X. ही व्यक्ती अगदी बालपणापासून सुखात लहानाची मोठी झाली. दु:ख कसे असते, किंवा कष्ट कसे असतात याची गंधवार्ताही या व्यक्तीला नव्हती. हुशार असल्याने खूप शिकली. फर्स्ट क्लास मिळवून डॉक्टर झाली. इथे तिची पुण्याई संपली. आई-वडिलांनी दोन-तीन लाख रुपये खर्च करून कर्ज काढून दवाखाना काढून दिला; परंतु एकही पेशंट येईना. पहिल्या काही पेशंटना फुकट औषध द्यायचे ठरविले; परंतु तरीही पेशंट येईना. असे काही महिने गेले. शेवटी त्याने दवाखाना बंद केला व नोकरी शोधावयास प्रारंभ केला; परंतु कोठेही नोकरी मिळाली नाही, यामुळे प्रचंड नैराश्य आले व या नैराश्यामध्ये शेवटी या व्यक्तीने आत्महत्या केली. आई-वडिलांच्या डोक्यावर मात्र दोन-तीन लाखांचे कर्ज राहिले व ते फेडता फेडता त्यांच्या नाकीनऊ आले. त्यांची सर्व मालमत्ता विकली गेली व अत्यंत गरिबीत त्यांना उरलेले आयुष्य काढावे लागले.

प्रतिक्षण पुण्याई खर्च होत राहते व पुण्याई न वाढविल्यास शेवटी अशी अवस्था होते.

माणसाच्या प्रत्येक श्वासाबरोबर त्याचे आयुष्य कमी-कमी होत असते, त्याचप्रमाणे सुखाच्या प्रत्येक घासाबरोबर माणसाचे पुण्यही कमी होत असते.

नेते, पुढारी मंडळी, तसेच अधिकारी, सत्ताधारी उघड-उघडपणे खोटे बोलत असतात. सत्तेच्या बळावर अनेक वाईट कामे करत असतात आणि तरीही ते सुखात असलेले दिसतात हे पाहून सामान्य मनुष्य म्हणतो, ‘‘देव आहे कुठे ? हे मदांध लोक इतके वाईट वागतात तरी त्यांना ईश्वर शिक्षा का करीत नाही ?’’

याचे उत्तर असे आहे की, पूर्वजन्मातील काही पुण्याईमुळे अशा लोकांना सत्ता व अधिकार प्राप्त झालेले असतात; परंतु हे लोक मनाने दुष्ट असतात, त्यामुळे वातावरणातील काही अदृश्य दुष्ट शक्ती यांच्या मन आणि बुद्धीवर ताबा मिळवितात व यांना मदांध, स्वार्थी, अहंकारी, लोभी अशा प्रवृत्तीचे बनवितात, यामुळे त्यांचे पुण्य अतिशय लवकर नष्ट होते. एकदा का पुण्य नष्ट झाले की, वातावरणातील दुष्ट शक्ती यांना अनेक मार्गाने घेरतात व अनेक प्रकारच्या यातना देतात.

मृत्यूनंतरही अशा लोकांना हजारो वर्षे यातनालोकात काढावी लागतात. येथे त्यांच्या यातनांना अंत नसतो व त्यांची

विचारपूस करणारेही तेथे कोणी नसतात. दहा–दहा हजार वर्षे निघून जातात; परंतु यातना काही संपत नाहीत. यातनालोकामध्ये करोडो आत्मे आजही हजारो वर्षांपासून यातना भोगत आहेत.

मनुष्याच्या मनामध्ये जेव्हा स्वार्थ, लोभ, अहंकार, मद, मत्सर, ईर्षा, द्वेष, कपट इत्यादी प्रवृत्तींचा उदय होतो त्याचवेळी त्याची पुण्याई संपलेली असते. याकरिता मानवाने या प्रवृत्तींपासून नेहमी दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

केवळ स्वत:च्याच कुटुंबाकरिता जगणाऱ्या माणसालाही परमेश्वराच्या दरबारात स्वार्थी म्हटले जाते. भूतलावरील अशा सज्जनांनाही परलोकात थोड्याफार शिक्षा भोगाव्या लागतात. परमेश्वराच्या या सर्वसाधारण शिक्षासुद्धा किमान शंभर–दीडशे वर्षांच्या असतात, म्हणून मानवाने सतत सावध राहून केवळ स्वत:करिता न जगता थोडाफार परोपकार करीत राहणे अत्यंत आवश्यक असते. कुटुंबवत्सल सज्जन माणसाकडूनही सहज घडणारी चूक त्याच्या लक्षात येत नाही व त्याचा परिणाम म्हणून अनेक लोकांचे पन्नाशीनंतर मानसिक स्वास्थ बिघडते व ते अशांत, अस्वस्थ व बेचैन होतात.

समाजामध्ये ज्यांना सज्जन समजले जाते, अशा कुटुंबवत्सल लोकांकडून स्वत:पुरतेच जगणे ही महाभयंकर चूक केवळ अज्ञानापोटी होत असते व त्याचे परिणाम या सर्व व्यक्तींना मृत्यूनंतर भोगावे लागतात. यापुढे असे घडू नये म्हणून

या गोष्टी स्पष्टपणे लिहिण्यासाठी ईश्वरच मला प्रेरणा देत आहे. हे पुस्तक वाचणारे वाचक थोडीफार ईश्वरभक्ती करणारेच असतील. त्यांना माझे असे सांगणे आहे की, त्यांनी ईश्वरभक्तीबरोबरच थोडाफार दानधर्म व परोपकार करीत राहिला पाहिजे. असे केल्याने जीवनाचे थोडेफार सार्थक केल्यासारखे होईल.

माझ्या माहितीतील एका गृहस्थाने वाहतुकीचा व्यवसाय सुरू केला. त्याला त्या धंद्यात इतके काही यश आले की, पाच-सहा वर्षांमध्ये त्याने चाळीस ट्रक खरेदी केले. येथे त्याची पुण्याई संपली व संपूर्ण घराण्याला उतरती कळा लागली. पुढील पाच वर्षांत सगळे ट्रक विकले गेले व कंपनी बंद झाली. घराण्यात भांडणतंटे इतके झाले की, शेवटी कोर्टकचेऱ्यांपर्यंत पाळी आली. हळूहळू सर्व वैभव नष्ट झाले व शेवटी त्याच मालकावर हातगाडी चालविण्याची पाळी आली.

भारतातील निजामाचे संस्थान हे सर्वात श्रीमंत संस्थान होते. इंग्रज सरकार निजामाकडून कर्ज घेत असे. त्याच निजामाचे वंशज सध्या अत्यंत गरिबीत व हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत, असे म्हटले जाते.

जोपर्यंत पुण्याई शिल्लक आहे, तोपर्यंत तुमच्या शब्दाला मान असतो, लोक तुमचा सन्मान करतात, ओळखीच्या अथवा अनोळखी प्रांतामध्येही तुमची कोठेही गैरसोय होत नाही. सर्वत्र यश, जय व कीर्ती यांचा लाभ होतो. जवळ पैसे नसतानाही,

अनोळखी प्रांतामध्ये तेथील भाषा येत नसतानासुद्धा जेवणाची, राहण्याची वगैरे उत्तम सोय होते व लोक प्रेमही देतात. या सर्व गोष्टी केवळ पुण्याईच्या बळावर घडून येत असतात.

पुण्य असेल तर काय घडते व पुण्य संपले की, कशी अवस्था होते याच्या कार्यकारणात्मक भावावर एक दृष्टिक्षेप:-

एखादा मनुष्य शंभर वर्षे इतरांना त्रास देत जगतो. त्याचे काहीही वाईट होत नाही.

याचे कारण असे की, पूर्वजन्मामध्ये याने थोडीफार तामसिक तपस्या केलेली असते. हे पुण्य त्याला साथ देत असते. त्याचे पुण्य लवकर संपावे म्हणून त्याला दुष्ट बुद्धी वातावरणातील तामसिक शक्ती देत असतात. त्याच्या पुढील जन्मामध्ये वाईट मार्गाने पैसा कमावलेल्या एखाद्या घराण्यात त्याचा जन्म होतो व बालवयातच पैशाची उधळपट्टी करणे व गुंडगिरी करणे अशा गोष्टी तो करू लागतो. अशा रितीने तीन जन्मांपूर्वी कमावलेली तामसिक पुण्याई संपते व त्याची अवस्था भिकाऱ्याहूनही कठीण होते.

याचे एक उदाहरण मी पाहिलेले आहे.

अंगी बैलाचे बळ व भरपूर पैसा यांच्या बळावर एक मनुष्य आपल्या गावातील सर्वांना सतावित असे. गावातील लोक हैराण झाले होते व ईश्वराची प्रार्थना करत असत की, या राक्षसापासून आम्हाला सोडव. एक दिवस या माणसाने एका मनुष्याला आपल्या

घरात कोंडले व घरात मिरचीची धुरी घालून मुख्य दरवाजाला बाहेरून कडी घालून स्वत: बाहेर बसला. इतक्यात त्याच्या मनात आले की, मिरचीच्या धुराने आतला माणूस कसा तडफडतो हे पाहावे. म्हणून तो त्या गवताच्या घरावर चढला व थोडेसे गवत बाजूला करून तो पाहणार इतक्यात, मिरचीच्या धुराने गुदमरू लागलेल्या घरातील माणसाने जवळच पडलेली एक काठी उचलली व गवताच्या छपराला भोक पाडून धुराला बाहेर जाण्यास वाट करून देण्यासाठी म्हणून गवताच्या छपरात खुपसली. तो राक्षसी मनुष्य छपरावर वाकायला व काठी बाहेर यायला एकच गाठ पडली. या काठीला एक बारीकसा खिळा होता, तो त्याच्या डोळ्यात गेला व राक्षसी माणसाचा एक डोळा गेला. काही दिवसांतच दुसऱ्या डोळ्याला इन्फेक्शन होऊन दोन्ही डोळे गेले. अखेरीस पोटाकरिता तो अनेक वर्षे भीक मागून जगत होता व त्याला पुरेशी भीकही मिळत नसे.

जोपर्यंत पुण्याई संपत नाही, तोपर्यंत शिक्षा देणाऱ्या ईश्वरीशक्ती गुन्हेगाराला शिक्षा करू शकत नाहीत. एखादा मनुष्य जर खूप दुष्ट असेल, तर त्याची पुण्याई लवकर संपवावी म्हणून वातावरणातील काही विशिष्ट शक्ती अशा व्यक्तीच्या हातून अधिकाधिक दुष्ट कर्मे घडवितात व त्याची पुण्याई संपवितात.

पुण्याई लवकर संपवावी म्हणून सत्पुरुषाला त्रास देण्याचे दुष्ट कर्म वातावरणातील या विशिष्ट शक्ती घडवून आणतात;

तसेच एखाद्या देवीसमान स्त्रीची निंदा करण्याची दुर्बुद्धी मानवास होते. या दोन्ही गोष्टी पुण्य जाळून टाकतात.

काहीतरी आकस्मिक कारण घडून बँकेतील पुंजी संपते व उधार उसनवार करण्याची पाळी येते. अगदी तसेच पुण्याई संपल्यानंतर मानवावर देवदेवतांना नवस करण्याची पाळी येते, किंवा एखाद्या सत्पुरुषाकडून पुण्याई उसनी घेण्याची पाळी येते. यासाठीच लोक देवतांना नवस करतात, तीर्थयात्रा करतात किंवा सत्पुरुषांची सेवा करतात.

एक गरीब परंतु अतिशय सद्‌भाविक मनुष्य होता. प्रभू रामचंद्राचे दर्शन व्हावे म्हणून त्याने पंचवीस कोटी रामनामाचा जप केला. पंचवीस कोटी रामनामाचा जप करण्यास त्याला सुमारे तीस वर्षे लागली. प्रभू रामचंद्राचे दर्शन व्हावे या एकाच आशेने त्याने पंचवीस कोटी जप पूर्ण केला होता; परंतु पंचवीस कोटी जप पूर्ण करूनही त्याला प्रभू रामचंद्राचे दर्शन झाले नाही. म्हणून अत्यंत क्षुब्ध होऊन तो सज्जनगडावरील समर्थ रामदास स्वामींच्या दर्शनास गेला व समर्थ रामदास स्वामींना उद्देशून वाट्टेल ते बोलू लागला. समाधीजवळच श्रीधरस्वामी ईश्वरचिंतन करीत बसले होते. त्यांनी विचारले 'काय झाले ?'

तेव्हा तो वृद्ध गृहस्थ म्हणाला,

''या समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेले आहे की, जो कोणी तेरा कोटी रामनामाचा जप करील त्याला प्रभू रामचंद्र

साक्षात् दर्शन देतील ! मी पंचवीस कोटी जप पूर्ण केला; परंतु मला अद्याप प्रभू रामचंद्राचे दर्शन झाले नाही. माझ्या आयुष्याची तीस वर्षे मी जप करण्यात खर्च केली व आता म्हातारा झालो. साधू-संतांनी अशा प्रकारे थापा मारून समाजाला चुकीची दिशा दाखविणे योग्य आहे काय ?'' अतिशय वैतागून रागारागाने तो वृद्ध गृहस्थ बोलत होता.

श्रीधरस्वामी म्हणाले, ''तेरा कोटी रामनामाचा जप केला असता प्रभू रामचंद्रांचे दर्शन होते हे खरे आहे.''

''मग मी पंचवीस कोटी रामनामाचा जप केला; हे खोटे आहे काय?'' चवताळून त्या वृद्ध गृहस्थाने विचारले.

''तुम्ही पंचवीस कोटी जप केलात हे अगदी खरे आहे व तेरा कोटी जपात दर्शन होते हेही खरे आहे. तुम्ही शांत व्हा ! मी तुम्हाला सर्व समजावून सांगतो !''

असे म्हणून श्रीधर स्वामींनी त्या वृद्ध गृहस्थाला कागद-पेन घेऊन बस म्हणून सांगितले व म्हणाले,

''एका बाजूला तुमचा रामनामाचा पंचवीस कोटी जप लिहा. ही तुमची जमा व दुसऱ्या बाजूला तुमच्या रामनाम जपाच्या पुण्याईचा खर्च लिहा.''

त्या वृद्ध गृहस्थाने त्याप्रमाणे लिहावयास सुरुवात केली. श्रीधरस्वामींनी खर्च सांगावयास सुरुवात केली.

**जमा** पंचवीस कोटी रामनाम जप

**खर्च**

१. मुलीचे लग्न होत नव्हते म्हणून अनेक वेळा रामाची प्रार्थनाकेली. साडेचार कोटी जपाची पुण्याई खर्च झाली व मुलीचे लग्न व्यवस्थित पार पडले.

२. मुलगा S.S.C.परीक्षेला अनेक वेळा नापास झाला होता. तो पास व्हावा म्हणून प्रार्थना केली. अडीच कोटी जपाची पुण्याई खर्च झाली व मुलगा चांगल्या गुणांनी पास झाला.

३. मुलाला नोकरी मिळावी म्हणून सतत प्रार्थना केली. पाच कोटी जपाची पुण्याई खर्च झाली व मुलाला चांगली नोकरी लागली.

४. पत्नी खूप आजारी होती. जगण्याची आशा सर्वांनी सोडली होती. रामाला खूप प्रार्थना केली. पत्नी वाचली. पाच कोटी जपाची पुण्याई खर्च झाली.

५. त्राग्यात देव व साधू-संतांना नावे ठेवली. एक कोटी जपाची पुण्याई खर्च झाली.

**एकूण जमा** **२५ कोटी**

**एकूण खर्च** **१८ कोटी**

**शिल्लक** **सात कोटी**

श्रीधरस्वामी म्हणाले, ‘‘अशा प्रकारे तुमची एकूण अठरा कोटी जपाची पुण्याई खर्च झालेली आहे व सात कोटी जपाची पुण्याई तुमच्याकडे शिल्लक आहे. रामाचे दर्शन हवे असल्यास निष्काम भावनेने आणखी सहा कोटी जप करा म्हणजे तुम्हाला प्रभू रामचंद्राचे दर्शन होईल.’’

श्रीधरस्वामींच्या या उपदेशाने त्या वृद्ध गृहस्थाचे पूर्ण समाधान झाले व आनंदाने तो आपल्या घरी गेला. उरलेला सहा कोटी जप त्याने पुढील तीन-चार वर्षांत पूर्ण केला व रामाचे दर्शन त्याला झाले.

वरील हकिकतीवरून पुढील गोष्टी वाचकांनी ध्यानात घ्याव्यात:-

१) सुख व दु:ख हे तुमच्याच कर्माचे फळ असते.

२) जेव्हा आपण सुखात असतो तेव्हा प्रतिक्षण पुण्याई खर्च होत असते.

३) एखादी समस्या, संकट, आपत्ती, इच्छा, आरोग्य अथवा अन्य कुठल्याही कारणासाठी आपण स्वत:साठी अथवा इतरांसाठी जेव्हा प्रार्थना करतो, तेव्हा आपली पुण्याई खर्च होत असते.

४) अनेक वेळा प्रार्थना करूनही जर आपले काम झाले नाही, तर पुण्य संपले आहे असे समजावे.

५) यश येत नसेल, कामे होत नसतील तर देवाला दोष न देता

पुण्याई वाढवावी.

६) आपल्या धंदा–उद्योगातील यश व आपल्याला मिळणारा पैसा, आपल्याला भेटणारी चांगली माणसे, आपल्या प्रयत्नांना येणारे यश, आपल्या स्वगावी अथवा परगावी मिळणारे सुख या सर्व गोष्टी आपली पूर्वजन्मातील किंवा या जन्मातील पुण्याई खर्च होऊन मिळत असतात, याचे भान ठेवून प्रत्येक माणसाने दररोज पुण्य वाढवावयास हवे.

७) आरोग्य, शारीरिक सुदृढता, प्रावीण्य, नैपुण्य, सद्गुण, सुस्वभाव, सौंदर्य, शरीराचा रेखीवपणा, चेहऱ्यावरील तेज, डोळ्यांतील तेज, बुद्धिमत्ता, वक्तृत्व, प्रभाव या सर्व गोष्टी पूर्वपुण्याईने प्राप्त होत असतात. या तशाच टिकाव्यात व पुढे वाढत राहाव्यात असे वाटत असेल, तर मनुष्याने अहंकार करू नये व ज्यांच्याजवळ या गोष्टी नाहीत त्यांना दोष देऊ नयेत. कारण या सर्व गोष्टी प्राप्त होण्यापूर्वी भरपूर पुण्याई खर्च झालेली असते. ज्यांच्याकडे यातील काही गोष्टी आहेत त्यांनी अहंकार न करता दानधर्म व ईश्वरभक्ती करून पुण्याई वाढवावयास हवी. ज्या क्षणी पुण्याई संपेल त्याच क्षणी आपत्ती येऊ लागतील, अडचणी येऊ लागतील अपयश येऊ लागेल म्हणून सतत पुण्याई वाढवीत राहायला हवी. याकरिता सुशिक्षिताने अशिक्षिताला दोष देऊ नये, श्रीमंतांनी गरीबांना नावे ठेवू

नयेत व भाग्यवंतांनी हीन-दीनांची उपेक्षा करू नये.

पुण्यप्रभाव कसा काम करतो यावर आणखी थोडा प्रकाशझोत टाकून हे प्रकरण आपण संपवूया !

एखादा खूप विद्वान व ज्ञानी लेखक मनुष्याच्या जीवनातील मूलभूत समस्येवर उपाय सांगणारे व योग्य मार्गदर्शन करणारे असे एखादे पुस्तक लिहितो.

समजा, यदाकदाचित पुस्तक लिहून पूर्ण होईपर्यंत सदरहू लेखकाची पुण्याई संपली, तर ते पुस्तक उत्तम दर्जाचे असूनही छापले जात नाही व छापल्यास ते खपत नाही.

याउलट दुसरा एखादा लेखक सामान्य दर्जाचे पुस्तक लिहितो व त्याच्या हजारो प्रती विकल्या जातात व त्या लेखकाचे नाव होते, त्याला कीर्ती प्राप्त होते.

**यावरून एक गोष्ट लक्षात येते की, तुमच्याकडे जर पुण्याई असेल, तर तुम्ही कचरा सोन्याच्या भावाने विकू शकता व पुण्याई संपली की, सोने मातीमोल भावाने विकण्याची पाळी येते.**

पूर्वजन्मीच्या पुण्याईच्या बळावर लोक अनेक पापे करतात व ती पचवितात, मदांधपणे वागतात, लूटमार करतात. इतके सर्व करूनही हे दुर्योधनाचे वंशज पुण्याईच्या बळावर लोकांवर आपली सत्ता गाजवितात. गाठी पुण्य असते, त्यामुळे कोणीच त्यांचे काहीही वाकडे करू शकत नाही. पुण्याईचा

शेवटचा अंश संपेपर्यंत हे लोक देवधर्म, लाजलज्जा कशाचीही पर्वा करत नाहीत. पुण्य संपल्यावर मात्र अशा लोकांची भयंकर दुर्दशा होते.

याउलट एखादा गरीब मनुष्य अत्यंत सज्जन असतो, खरे बोलणारा असतो, प्रेमळ असतो, दयाळू असतो, परोपकारी असतो; परंतु गाठी पुण्य नसते; त्यामुळे त्याच्या अंगातील सद्‌गुणसुद्धा दुर्गुणासारखे काम करायला लागतात. अति खरे बोलल्याने लोकांत किंमत राहत नाही. सरळ व मोकळेपणाने वागल्याने जो भेटेल तो उल्लू बनवितो. त्याच्या परोपकारी स्वभावाचा फायदा दुष्ट व दुर्जन लोक घेतात व जितके लुटता येईल तितके लुटतात.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे या माणसाला सद्‌गुण मिळाले; परंतु सद्‌गुणांचा यथायोग्य वापर करण्यासाठी जी पुण्याई आवश्यक होती ती या गृहस्थाने पूर्वजन्मात मिळवून ठेवली नाही व त्यामुळे सद्‌गुणी असूनही नैराश्यमय जीवन वाट्याला आले.

जीवनातील प्रत्येक क्षणाला पुण्य खर्च होत असते, साथ देत असते व पुण्य संपताच जीवन थबकते, अर्थहीन होते, यामुळे समाजात पुढील प्रकार दिसून येतात.

शिक्षण आहे, पैसा आहे; परंतु शांती, समाधान नाही.

शिक्षण आहे, पैसा आहे; परंतु पिशाच्च्यांचे उपद्रव घराण्याला सतावित आहेत.

घराण्यातील ज्येष्ठ संतती पराकोटीची स्वार्थी, पराकोटीची कंजूष, तऱ्हेवाईक स्वभावाची किंवा वेडसर अशी निर्माण होत आहे व या एकाच व्यक्तीमुळे घराण्यातील इतर सज्जनांना क्लेश होत आहेत. घराण्यातील कनिष्ठ संतती हट्टी व उपद्रवी स्वभावाची निर्माण होत आहे व त्यामुळे घराण्याला क्लेश होत आहेत.

धंदा-उद्योग सुरू करेपर्यंत सर्व सुरळीत चालले; परंतु प्रत्यक्षात धंदा सुरू केल्यानंतर धंदा चालेनासा झाला. दुकान काढले, गिऱ्हाईक येईना; दवाखाना काढला, पेशंट येईना; पैसे कमाविले, जवळ राहिना; कितीही उद्योगधंदे केले, तरी यश येईना, बरकत येईना; संतती होईना, झाल्यास जगेना; खुनशी व गुंडगिरी प्रवृत्तीची संतती निर्माण होणे; शेतात उत्पन्न न येणे; कोर्टकचेऱ्यांनी हैराण होणे.

आपण प्रेमाने वागत असूनही व परोपकार करत असूनही लोकांनी त्रास देणे. सतत अपयश येणे.

तीर्थयात्रा न होणे, ईश्वरभक्ती न होणे, सद्ग्रंथांचे वाचन करण्याची बुद्धी न होणे, या सर्व गोष्टी करण्याची इच्छा आहे; परंतु वेळ न मिळणे. यांपैकी काही एक हातून होत नसतानाही आपण भरपूर काहीतरी देवाचे करीत आहोत अशा प्रकारचा भ्रम होणे. देवाची आपल्यावर भरपूर कृपा आहे अशा प्रकारचा भ्रम

होणे, आपण खूप ज्ञानी आहोत, सद्‌गुणी आहोत अशा प्रकारचा भ्रम होणे.

तंत्र-मंत्राच्या पिशाच्च साधना करण्याची आवड निर्माण होणे. जारण-मारणाची आवड निर्माण होणे, पिशाच्च साधना करून क्षुद्र सिद्धी मिळविण्याची इच्छा निर्माण होणे, क्षुद्र साधना व स्मशान साधना अशा गोष्टी करणाऱ्यांचा सहवास करणे, पिशाच्च सिद्धी मिळवून ज्याने जनमानसावर आपला पगडा बसविलेला आहे, अशा लोकांच्या नादी लागणे.

सतत खोटे बोलत राहणे, लोकांना उल्लू बनविणे, फक्त स्वत:च्या स्वार्थाचाच विचार करणे, ईर्षा, द्वेष, मत्सर करणे, दानधर्म करण्याची बुद्धी न होणे. वकील झाला; परंतु वकिली चालत नाही. धंद्यासाठी वाहन घेतले, उत्पन्न पाच हजार व खर्च आठ हजार अशी स्थिती होणे.

या सर्व गोष्टी पुण्याई खर्च झाल्याने, पुण्याई संपल्याने अथवा पुण्याई कमी झाल्याने होत असतात. यास्तव सतत पुण्याई वाढवीत राहायला हवी.

पुण्याई संपते व मनुष्य अडचणीत येतो. अडचणीत आल्यानंतर देवाला व साधू-संतांना दोष देऊ लागतो, 'खऱ्याची दुनिया नाही,' असे म्हणू लागतो; परंतु 'तूची तुझ्या जीवनाचा शिल्पकार' असे एका कवीने म्हटले आहे, ते अक्षरश: खरे आहे.

मनाला क्लेश होऊ लागले, दु:ख व कष्ट होऊ लागले

की पुण्याई संपली किंवा संपत आली असे समजावे.

वाचकांनी मला नावे ठेवली तरी हरकत नाही. लिखाणाचा अतिरेक किंवा अतिशयोक्ती केली असे म्हटले तरी हरकत नाही; परंतु पोटातील अन्न पचविण्याससुद्धा पुण्याई खर्च होत असते. विशिष्ट प्रकारची पुण्याई पोटातील अन्न पचवित असते व ती जवळ नसली तर खाल्लेले अन्नही पचत नाही.

हे पुस्तक सर्वसामान्य वाचकांसाठी लिहिलेले असल्याने पुण्याई या एकाच शब्दावर भर देऊन त्या विषयाचे विवेचन केले आहे; परंतु पुण्याईचे असंख्य प्रकार असून विशिष्ट प्रकारच्या पुण्याईचा विशिष्ट प्रभाव व विशिष्ट प्रकाश असतो. हा विषय अत्यंत किचकट व सर्वसामान्य माणसास समजण्यास कठीण असा आहे, तरीपण पुढील उदाहरणावरून हा विषय वाचकांच्या थोडाफार लक्षात येईल.

एक मनुष्य पोटाच्या व्यथेने अतिशय पीडित होता. अनेक प्रकारचे औषधोपचार करूनही पोटव्यथा जाईना. अखेरीस त्याला एक साधू भेटला. साधूचे दर्शन घेऊन तो साधूला म्हणाला,

''एके काळी मी किलो-किलोचे अन्न पचवित असे. शंभर किलोंचे पोते पाठीवर उचलून नेत असे व आज मला साधे ताकही पचत नाही. अशी माझी दशा का झाली बरे ? मी असे काय पाप केले ?''

दिसावयास तो मनुष्य अतिशय सज्जन होता. पहिलवानी

हा त्याचा पेशा होता; परंतु गेली दहा वर्षे पोटाच्या व्यथेने त्याला असे काही हैराण केले होते की, त्याला कुस्तीचा आखाडा सोडून द्यावा लागला व तो अतिशय दुर्बल झाला होता, अंगात उठण्या-बसण्याची ताकद नव्हती. त्याला अतिशय क्लेश होत होते.

साधूने थोडा वेळ डोळे मिटून ध्यान केले व म्हणाला,

''कामोत्तेजना वाढविण्यासाठी तू दररोज असंख्य चिमण्या मारून त्यांचे मांस अनेक वर्षे खाल्लेले आहे. तुझ्या पापाच्या मानाने ईश्वराने तुला फारच कमी शिक्षा केली आहे यावर माझ्याकडे उपाय नाही.''

''आपण सांगितलेली गोष्ट अगदी खरी आहे,'' असे सांगून, त्या साधूच्या पाया पडून तो मनुष्य घरी गेला.

आरोग्य, शांती, समाधान, आनंद या सर्व गोष्टी पुण्याईने प्राप्त होतात. पुण्याई संपली की दारिद्र्य, दु:ख, क्लेश, अनारोग्य व अशिक्षितपणा, गर्व, अहंकार या गोष्टी वाट्याला येतात.

हे लिहित असताना मला एक गोष्ट आठवली ती सांगून हे प्रकरण संपवितो.

आपल्या विचित्र वागण्यामुळे एक मनुष्य आपली सर्व पुण्याई संपवून बसला होता व अनेक अडचणींना तोंड देत होता. इतक्यात त्याची एका सिद्धपुरुषाबरोबर गाठ पडली. सिद्धपुरुषाने त्याला आधार दिला व त्याचे सर्व गाडे पुनश्च रुळावर आणले.

येथे त्या सिद्धपुरुषाने स्वत:ची पुण्याई खर्च करून या मनुष्याला सावरले होते; परंतु या विचित्र स्वभावाच्या मनुष्याला 'हे माझे कर्तृत्व आहे' असे वाटू लागले.

सिद्धपुरुषाने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे त्याचा विचित्रपणा आणखीनच वाढला. नंतर तो सिद्धपुरुषालाच गोष्टी शिकवू लागला व सिद्धपुरुष जे काही सांगत त्याची अवहेलना करू लागला. शेवटी कंटाळून सिद्धपुरुषाने त्याचा नाद सोडून दिला.

सिद्धपुरुषाने त्याचा हात सोडताच काही दिवसांतच त्याचे सर्व वैभव नष्ट झाले व पुनश्च तो मूळ पदावर आला.

सिद्धपुरुषाच्या कृपेने लठ्ठ पगाराची नोकरी लागली. इतरही अनेक गोष्टीत यश आले. कंपनीने स्वखर्चाने परदेशात पाठविण्याचे ठरविले. त्यासाठी सर्व कागदपत्रे तयार झाली; परंतु उन्मत्तपणे वागल्याने ईश्वरीकृपा निघून गेली व तात्काळ नोकरीही गेली.

यावरून वाचकांनी योग्य तो बोध घ्यावा. माणसाच्या वागण्यावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात, हे यावरून सिद्ध होते. उदार अंत:करणाने वागणारा गरीब मनुष्य ईश्वराला खूप प्रिय असतो.

# ५. ईश्वरीशिक्षा कशा होतात?

प्रत्यक्षामध्ये ईश्वर कोणालाही शिक्षा करत नसतो; परंतु अदृश्य सृष्टीतील देवदेवता, शक्ती, अर्धदेवता, क्षुद्र देवता, भैरव, क्षेत्रपाल इत्यादी आत्मे प्रत्येक माणसाला त्याच्या चांगल्या कर्माचे व वाईट कर्माचे फळ देत असतात. वाईट कर्माच्या फळाला आपण ईश्वरीशिक्षा असे म्हणतो, तर चांगल्या कर्माच्या फळाला आपण ईश्वरीकृपा असे म्हणतो. या प्रकरणामध्ये आपण ईश्वरीशिक्षा कशा होतात एवढेच पाहावयाचे आहे.

एखाद्या व्यक्तीला सुधारण्यासाठी भरपूर संधी दिली व त्याला प्रार्थनेचे अनुभव दिले. सज्जन लोकांचा सहवास दिला. सत्पुरुषांचे आशीर्वाद दिले. इतके सर्व करूनही जर त्या माणसात नम्रता, प्रेम, नि:स्वार्थ, निरहंकारता इत्यादी आध्यात्मिक सद्‌गुण प्रकट झाले नाहीत, तर मग ईश्वरीशिक्षा व्हावयास सुरुवात होते.

अशा व्यक्तीच्या मनातील श्रद्धा वातावरणातील क्षुद्रशक्ती नष्ट करतात. पिशाच्चशक्ती त्याच्या शरीरात शिरू लागतात. या पिशाच्चशक्ती अंत:करणातील श्रद्धा, भक्ती नष्ट करून अशा माणसाला आळशी, श्रद्धाहीन, भक्तिहीन असा बनवितात. त्याच्या मनात नेहमी वाईट विचार निर्माण करतात. स्वार्थ, अहंकार इत्यादी दुर्गुण पराकोटीचे वाढतात, लोभ वाढू लागतो. विविध मार्गाने पैसा कसा मिळविता येईल, एवढा एकच विचार त्याच्या मनात येतो. ईर्षा, द्वेष, मत्सर, इतरांवर जळणे असे प्रकार तो करू लागतो. या त्याच्या वागण्यामुळे त्याचे सर्व पुण्य नष्ट होते, किंबहुना वातावरणातील शक्ती त्याचे सर्व पुण्य नष्ट करून टाकतात. घरातील बरकत नष्ट होते, कितीही पैसा कमाविला तरी पुरा पडत नाही, मन अशांत व अस्वस्थ होते. मृत्यूनंतर असे लोक पिशाच्च योनीत जातात व हजारो वर्षे तिथे खितपत पडतात.

सर्वसाधारणपणे ईश्वरीशिक्षेचे स्वरूप कसे असते, याचे हे थोडक्यात केलेले वर्णन आहे. याशिवाय पापकर्माच्या कठोर शिक्षा होत असतात. या कठोर शिक्षा करताना वातावरणातील शक्ती कुठलीच दयामाया दाखवत नाहीत. जन्मांधता, पंगुत्व, कुरूपत्व, भाजणे, पोलिओ या सारखे रोग, दारिद्र्य, मंदबुद्धी, शिकण्याची इच्छा नसणे, पिशाच्चबाधा, मुके, आंधळे, बहिरेपण या सर्व गोष्टी ईश्वरीशिक्षेत गणल्या जातात.

काही सत्ताधारी, अधिकारी, श्रीमंत, सावकार असे

लोक गोरगरीबांना खूप छळतात, त्रास देतात; परंतु त्यांना काहीच शिक्षा होत नाही असे दिसून येते. लोक म्हणतात, ''हे लोक इतके वाईट वागतात, तरी ईश्वर यांना शिक्षा करत नाही हे कसे?''

याचे उत्तर असे की,

''वरील लोकांजवळ जोपर्यंत पुण्याईचा साठा आहे, तोपर्यंत वातावरणातील शक्ती यांना शिक्षा करू शकत नाही. उन्मत्तपणे वागणाऱ्या या लोकांचा पुण्याईचा साठा लवकर संपावा म्हणून वातावरणातील काही शक्ती अशा लोकांना सतत दुर्बुद्धी देत राहतात व लवकरात लवकर यांची पुण्याई संपून जाईल अशी व्यवस्था करतात; परंतु या वाईट लोकांतही काही आत्मे असे असतात की, त्यांनी पूर्वजन्मामध्ये सत्तेच्या लोभाने थोडीफार तपस्या केलेली असते.

या तपस्येने हे लोक साठ-सत्तर वर्षे एखाद्या देशावर राज्य करतात. त्यांची पुण्याई पूर्णपणे संपेपर्यंत वातावरणातील शक्ती त्यांचे काही वाकडे करू शकत नाही. असे लोक प्रजेवर जुलूम करतात, अन्याय करतात. पुण्याई संपल्यावर एक दिवस मरून जातात व नंतर नरकामध्ये लाखो वर्षे यातना भोगत राहतात.

सर्वसाधारण माणसाच्या बाबतीत त्याच्यावरील ईश्वरी-कृपा नाहीशी होऊ लागली आहे, हे पुढील गोष्टींवरून लक्षात येते. त्याला देवाचे काही करावे असे वाटत नाही. जप,

स्तोत्रवाचन इत्यादी गोष्टी त्याच्याकडून होत नाहीत. सद्ग्रंथ वाचनाची इच्छा होत नाही. पुण्यस्थळी म्हणजे मंदिरे, शक्तिपीठे, तीर्थयात्रा, तीर्थस्थाने इत्यादी ठिकाणी त्याचे जाणे होत नाही. अशा गोष्टी जीवनात घडू लागल्या की, ईश्वरीकृपा नाहीशी होऊ लागली असे समजावे.

यानंतर अहंकार व दर्प वाढू लागतात. कोणी काही हिताच्या गोष्टी सांगितल्या, तर पटेनासे होते. सद्गुण निघून जातात. मनुष्य स्वत:ला अति शहाणा समजू लागतो. इतरांना नावे ठेवणे, इतरांना दोष देणे अशा गोष्टी करू लागतो. श्रद्धा निघून जाते, अशा प्रकारे त्याची अधोगती होते.

सामान्य सज्जन माणसाची अधोगती कशी होते याचे हे वर्णन आहे. दुष्ट, दुर्जन, उन्मत्त, मदांध अशा लोकांचा विचार या पुस्तकात केलेला नाही.

ईश्वरीकृपा कशी नष्ट होते याचा जर सूक्ष्म विचार केला तर समाजातील हजारापैकी नऊशे नव्याण्णव लोकांवरील ईश्वरीकृपा कमी होत आहे अथवा नष्ट होत आहे असे दिसून येईल.

प्रार्थनेमध्ये अद्भुत शक्ती असते. कळवळून अथवा तळमळून ईश्वराची प्रार्थना केली असता मानवाला तात्काळ ईश्वराची मदत मिळते. एखाद्या पापी माणसानेही तळमळून ईश्वराची प्रार्थना केल्यास त्यालाही ईश्वरी सृष्टीतून मदत मिळते; परंतु मनुष्य जर पुन:पुन्हा चुका करू लागला, कृतघ्नतेने वागू लागला

पुन:पुन्हा स्वार्थासाठी प्रार्थना करू लागला तर मात्र अदृश्य सृष्टीतील देवदेवता प्रार्थनेला प्रतिउत्तर देत नाहीत.

प्रार्थनेमध्ये किती अद्‌भुत शक्ती असते याचे एक उत्तम उदाहरण आठवले, तेवढे सांगून हे प्रकरण संपवितो.

मास्टर C.V.V. म्हणून एक थोर योगी आंध्र प्रदेशात सुमारे शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांचे शिष्य व्ही. प्रभाकर शास्त्री. या व्ही. प्रभाकर शास्त्रींचे एक शिष्य होते. यांचे वय सुमारे ७५ वर्षांचे होते. त्यांना सर्वजण ताथागारू म्हणजे आजोबा असे म्हणत.

या आजोबांकडे अनेक लोक येत असत. रोग निवारणाची अद्‌भुत शक्ती त्यांच्याकडे होती. व्याधीग्रस्त आपली व्याधी त्यांना सांगे. ते आकाशाकडे बघून हात जोडून म्हणत ''मास्टर C.V.V. नमस्कारम् !'' नंतर ते समोर बसलेल्या सर्वांना मास्टर C.V.V. नमस्कारम् असे म्हणायला सांगत. नंतर सर्वांना दोन-तीन मिनिटे शांतपणे बसायला सांगत व या दोन-तीन मिनिटांमध्ये ते मास्टर C.V.V. ना उपस्थित जनांच्या व्याधी निवारणार्थ प्रार्थना करत. अशा वेळी उपस्थित जनांना आपली व्याधी पूर्ण बरी झाली आहे, असा अनुभव येत असे.

या आजोबांच्या सहवासात आणखी एक अद्‌भुत प्रकार पहायला मिळत असे.

समजा, एखाद्या व्यक्तीला लिंबू खाल्ल्यानंतर जर उलटी

होत असेल व डॉक्टरने कधीही लिंबू खाऊ नकोस असे सांगितले असेल, तर हे आजोबा आपल्या समोर बसवून त्या रोगी व्यक्तीला प्रथम दोन-चार लिंबांचे सरबत पाजायचे. या आजोबांच्या समोर बसून डॉक्टरने जो पदार्थ खाण्यास मनाई केली आहे, तो सेवन केला असता रोग्यास काहीही त्रास होत नसे व ''आजपासून हे भरपूर खात जा !'' असे ते व्याधीग्रस्त माणसास सांगत असत.

अशा प्रकारे हजारो व्याधीग्रस्त लोकांना या वृद्ध आजोबांनी व्याधीमुक्त केले. त्यांच्या प्रार्थनेमध्ये अद्‌भुत शक्ती होती. तुझ्या प्रार्थनेला मी पावेन, असा आशीर्वाद त्यांना ईश्वराने दिलेला होता. प्रार्थनेमध्ये किती अद्‌भुत शक्ती असते याचे हे उत्तम उदाहरण होय !

महाराष्ट्रातील अनेक लोक देवाला नवस करतात. नवस केल्यानंतर त्यांचे काम होते. हा नवस फेडणे अत्यंत आवश्यक असते. जर नवस फेडला नाही तर मोठे पाप लागते. म्हणून शक्यतो नवस करू नये व नवस केला तर विसरू नये. नवस हे प्रार्थनेचे एक अंग असून, नवस केल्यानंतर ज्या देवतेला आपण नवस करतो, ती देवता आपल्याला पुण्य उसने देते व त्यामुळे आपले अडलेले काम होते. काम झाल्यानंतर नवसामध्ये बोललेली वस्तू देवाला लवकरात लवकर पोहोचवावी लागते. तसे न केल्यास त्या देवतेचा कोप होतो व त्याचे परिणाम पुढील अनेक पिढ्यांना भोगावे लागतात.

'करावे तसे भरावे' हा ईश्वरी नियम सर्वांनाच माहीत आहे. ईश्वराचा आणखी एक असा नियम आहे की, आई-वडील जे काही कर्म करतात त्या कर्माचे परिणाम मुलांना भोगावे लागतात. हा ईश्वरी नियम असंख्य आई-वडिलांना माहीत नसतो. असंख्य आई-वडिलांची असंख्य मुले या नियमाच्या उल्लंघनाची फळे भोगत असतात.

हा मुद्दा वाचकांना समजावा म्हणून अनेक सत्यकथा माझ्याजवळ आहेत; परंतु उदाहरणादाखल मी काही सत्यकथा येथे नमूद करीत आहे.

**पहिली सत्यकथा -**

एक अत्यंत सज्जन गृहस्थ होते. धार्मिक पुस्तकांच्या छपाईचे काम ते करीत असत. यांच्या छपाईचे काम पुढील प्रमाणे चालत असे.

गिऱ्हाईक यांच्याकडे छपाईसाठी ग्रंथ आणून देत असत.

हातात घेतलेला ग्रंथ ते ऱ्हस्व-दीर्घाच्या चुका तपासण्यासाठी एका तज्ज्ञ माणसाकडे देत असत.

नंतर ते पुस्तक कंपॉझिटरकडे जात असे.

कंपॉझिटरकडून कंपोझ झालेली पाने प्रूफरीडरकडे जात असत व नंतर पुस्तक छापले जात असे. अशा प्रकारे धार्मिक पुस्तकांच्या हजारो प्रती छापल्या जात असत. धार्मिक पुस्तकाचे

काम करणाऱ्या या व्यक्तीला या सर्व धार्मिक कामातून खूप आनंद मिळत असे.

अत्यंत सज्जन व धार्मिक अशा या सद्गृहस्थाकडून एक बारीकशी चूक होत होती व ती चूक म्हणजे,

हा सज्जन गृहस्थ मूळ प्रतीप्रमाणे ग्रंथ झाला आहे की नाही हे स्वत: कधी तपासत नसे. इतके करण्यास त्याला वेळ मिळत नसे, यामुळे छापून झालेल्या ग्रंथांमध्ये चुका राहत. कुठे तर ओळीच्या ओळी गायब होत व यातील काहीही या सद्गृहस्थास कळत नसे.

कारण हा छपाईसाठी घेतलेले पुस्तक वाचतच नसे. ते बरोबर झाले आहे की नाही हे बघत नसे.

वाचकांचा विश्वास बसणार नाही; परंतु केवळ एवढ्याच गोष्टीमुळे या गृहस्थाला खूप मोठे पाप लागले व पुढे त्यांना अनेक अडीअडचणी येऊ लागल्या. सतत दहा वर्षे खूप प्रयत्न करूनही त्यांच्या मुलीचे लग्न होईना. मुलीच्या लग्नामध्ये चित्रविचित्र समस्या निर्माण होऊ लागल्या. एक-दोनदा तर पत्रिका छापूनही लग्न मोडले.

हैराण झालेला हा धार्मिक, सज्जन, पापभीरू गृहस्थ शेवटी अनेक मंदिरांमध्ये जाऊन नमस्कार करून माझे असे का होते म्हणून प्रार्थना करू लागला. ज्योतिषांना प्रश्न विचारू लागला. त्याच्या मनाचे कोठेच समाधान होईना.

अखेरीस त्याला एक साधू भेटला व त्या साधूने त्याला सांगितले,

''स्वत:शी प्रामाणिक रहा!''

'Be honest with yourself first and then with your God'

''तू तुझा धंदा-उद्योग करताना स्वत:शी प्रामाणिक राहिला नाहीस. प्रिंटिंग करण्यापूर्वी धार्मिक, आध्यात्मिक ग्रंथ बरोबर झाले आहेत की नाहीत याकडे लक्ष दिले नाहीस, यामुळे तुझ्यासमोर या सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत.''

''यापुढे कुठलेही धार्मिक काम करताना ईश्वराची पूजा म्हणून करत जा ! ईश्वराला त्यात पाहा ! 'Work is Worship' हातात घेतलेले काम हीच ईश्वराची पूजा आहे, असे समजून प्रामाणिकपणे काम कर !''

''ज्या दिवशी तू हे करावयास सुरुवात करशील त्या दिवसापासून एकविसाव्या महिन्यात तुझ्या मुलीचे लग्न होईल, तसेच तुझ्या सर्व समस्या सुटतील.''

त्या धार्मिक गृहस्थाने साधूच्या उपदेशाप्रमाणे वागावयास सुरुवात केली. त्याच्या सर्व अडचणी दूर झाल्या, मुलीचे लग्नही झाले.

लेखकांना फसवून स्वत:चे उखळ पांढरे करणाऱ्या प्रकाशकांनी यातून बोध घ्यावा.

लबाडी करत जगणाऱ्यांनी वरील कथेतून बोध घ्यावा.

## दुसरी सत्यकथा –

एक गृहस्थ होता. खोटे बोलणे, थापा मारणे, लोकांना टोप्या घालणे हा त्याचा स्वभाव.

एकदा त्याने एका मंदिराच्या पुजाऱ्याजवळ तीन हजार रुपये मागितले. मंदिराचा पुजारी म्हणाला, माझ्याकडे इतके पैसे नाहीत.

तेव्हा हा लबाड गृहस्थ म्हणाला,

"मंदिराच्या हुंडी बॉक्सची चावी तुझ्याकडे आहे. त्यातील तीन हजार रुपये तू मला दे. आठ दिवसांत मी तुला पैसे परत आणून देतो."

पुजाऱ्याला विश्वास वाटला, त्याने पैसे दिले.

या लबाड गृहस्थाने अशा प्रकारे अनेकांना फसविले होते व त्याच्या पापाचा घडाही भरलेला होता.

परत देण्यासाठी त्याने पैसे घेतलेच नव्हते.

आठ दिवस झाले, पंधरा दिवस झाले. नंतर मात्र पुजाऱ्याने त्या लबाड गृहस्थाला विचारले. परंतु तो काही ना काही कारणे सांगून टाळाटाळ करू लागला. अशी दोन वर्षे निघून गेली.

शेवटी ईश्वरी न्यायाचा दिवस उगवला.

त्या लबाड गृहस्थाचे वय सुमारे पंचावन्नच्या आसपास होते. त्याचा मुलगा व सून मुंबईला राहत होते. त्यांना लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या होत्या. आपल्या मुलाला, सुनेला व नातवाला भेटण्यासाठी म्हणून हा लबाड मनुष्य मुंबईला आला.

नातवाचा पाचवा वाढदिवस आनंदाने साजरा केला. वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी सर्वजण राणीच्या बागेत फिरावयास गेले.

राणीच्या बागेतील घोड्यासमोर उभे राहून सर्वजण घोड्याकडे पाहत होते. आजोबा आपल्या पाच वर्षांच्या नातवाला घोड्यासंबंधी काहीतरी सांगत होते. इतक्यात, घोड्याने लाथ मारली व नातवाचा जबडा फोडून काढला.

आई-वडील व आजोबा यांची एकच धावपळ उडाली. ताबडतोब टॅक्सी करून नातवाला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पंचवीस-तीस हजार रुपये खर्च करून मुलाच्या जबड्याचे ऑपरेशन केले. त्यानंतर आठ दिवसांनी मुलाच्या आई-वडिलांची नोकरी गेली. होते नव्हते ते विकून खाण्याची पाळी आली व शेवटी अन्नान्न दशा झाली. त्यांच्या जीवनात चक्री वादळ आले, सर्व काही नष्ट झाले.

संकटाचे डोंगर कोसळल्यानंतर सर्वांनाच देव आठवतो, त्याप्रमाणे यालाही देव आठवला. व 'असे का होते?' हे विचारण्यासाठी तो ठिकठिकाणी फिरू लागला.

'शोधा म्हणजे सापडेल' या न्यायाप्रमाणे शेवटी त्यालाही ईश्वराच्या दयेने एक साधू भेटला. साधूला त्याने आपली सर्व हकिकत सांगितली.

साधू म्हणाला,

''तू एका सद्भक्ताकडून पैसे घेतलेस व ते परत दिले नाहीस. तू त्याला फसवलेस, म्हणून या सर्व आपत्ती तुझ्यावर कोसळल्या आहेत.'' असे म्हणून त्या साधूने पुजाऱ्याची हकिकत जशीच्या तशी त्या गृहस्थाला सांगितली.

यावर तो लबाड गृहस्थ म्हणाला,

''त्या पुजाऱ्याला मी फसविले हे अगदी खरे आहे; पण शिक्षा मात्र माझ्या मुलाला, सुनेला व नातवाला झाली असे का? नातवाचा जबडा गेला. तो दुरुस्त करायला पंचवीस-तीस हजार रुपये खर्च आला. मुलाची व सुनेची नोकरी गेली. दोन-तीन महिन्यांत सर्व कमावलेले नष्ट झाले, असे का? गुन्हेगार मी आहे, ईश्वराने मला शिक्षा करावयाला पाहिजे होती.''

यावर त्या साधूने उत्तर दिले,

''संसारी मनुष्य जे काही कर्म करतो- चांगले अथवा वाईट- ते सर्व आपल्या बायको-मुलांसाठी, नातवा-सुनांसाठी करत असतो, त्यामुळे त्याच्या कर्मांची फळे त्यांना भोगावी लागतात.''

''तुझ्या कर्मांची फळे तुझा मुलगा, नातू व सून भोगत

आहेत.''

''यावर उपाय काय?'' लबाड गृहस्थाने विचारले.

''तुझ्या मुलाने त्या पुजाऱ्याच्या घरी जाऊन त्याची उष्टी-खरकटी भांडी घासणे हाच एकमेव उपाय आहे. याशिवाय घेतलेले सर्व पैसे दुप्पट करून परत द्यावे लागतील.''

साधुपुरुषाने हा उपाय सांगितला. त्या लबाड गृहस्थाला हा उपाय फारसा मानवला नाही. अशा स्थितीत आणखी सहा महिने गेले. मुंबईतील जागाही गेली व परिस्थिती आणखी कठीण झाली. पुजाऱ्याच्या गावी जाण्याइतके बसभाड्याचे पैसेही जवळ राहिले नाहीत.

शेवटी त्या लबाड गृहस्थाच्या मुलाने पुजाऱ्याच्या घरी जाऊन भांडी घासायचे ठरविले. त्याप्रमाणे ईश्वराची प्रार्थना करून, क्षमा मागून, ट्रकने प्रवास करत करत तो पुजाऱ्याच्या गावी पोचला व सुमारे वर्षभर त्याच्याकडे काम केल्यानंतर त्याची परिस्थिती हळूहळू सुधारू लागली. तद्नंतर त्याने त्याचे पैसे दुप्पट करून परत केले.

## तिसरी सत्यकथा –

माझ्या माहितीतील विरुद्ध स्वभावाच्या दोन व्यक्तींची ही कथा वाचकांना कसे वागावे व कसे वागू नये हे शिकवील.

गुंडू नरसिंहा हा मनाने अगदी स्वच्छ व सरळ. आठ

तासांची नोकरी करून उरलेला वेळ तो देवाच्या सेवेत व ईश्वरचिंतनात घालवीत असे. कालांतराने तो सेवानिवृत्त झाला. पेन्शन, ग्रॅच्युइटी, फंड इत्यादी सर्व गोष्टी त्याला व्यवस्थित मिळाल्या. कसलीही अडचण आली नाही व त्याचे संपूर्ण आयुष्य सुखाने गेले.

दुसऱ्या सद्‌गृहस्थाचे नाव राजाराव. हा सज्जन होता परंतु अतिशय अहंकारी. अधिकारी पदावर असून आपण पैसे खात नाही याचाच त्याला अहंकार. या अहंकाराने अनेक दुष्प्रवृत्तींना जन्म दिला व यामुळे पत्नीबरोबर सतत भांडण होत असे. सज्जन असूनही अहंकारी वृत्तीमुळे त्याचेकडून अनेक अपराध घडले. निवृत्तीनंतर त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. पेन्शन, ग्रॅच्युइटी, प्रॉव्हिडंट फंड इत्यादीसाठी त्याला कोर्ट-कचेऱ्या कराव्या लागल्या. यात दोन-तीन वर्षे गेली. अनेक प्रकारचा मानसिक त्रास त्याला भोगावा लागला. सज्जन असूनही केवळ अहंकारामुळे अशा प्रकारे ईश्वरी शिक्षांना तोंड द्यावे लागले.

## चौथी सत्यकथा –

माझा सख्खा मोठा भाऊ खूप अहंकाराने वागत असे. त्याच्या बोलण्यातून सतत अहंकार व्यक्त होत असे. त्याच्या अहंकारी स्वभावामुळे लोक त्याच्यावर नाखुष असत. अखेरीस

तो मरण पावला. यमाच्या दरबारात गेल्यानंतर त्याला काय काय शिक्षा झाल्या हे ईश्वर जाणे; परंतु अदृश्य सृष्टीतील आत्म्यांनी त्याला असे दाखवून दिले की– ''तुझा सख्खा भाऊ सिद्धपुरुष असून अनेकांचे कल्याण करीत आहे व तू स्वत:चे कल्याण करण्याऐवजी अहंकाराने वागलास त्याची शिक्षा भोगणे तुला भाग आहे.''

माझ्या भावाच्या आत्म्याला अतिशय पश्चात्ताप झाला. पश्चात्तापाने तो पोळून निघाला. ईश्वराकडे त्याने आपल्याला आणखी एक संधी मिळावी म्हणून प्रार्थना केली व ईश्वराने त्याला परत पृथ्वीतलावर पाठविले

या घटनेला पंचवीस वर्षे होऊन गेली आहेत. पूर्वजन्मीचा माझा भाऊ तेवीस वर्षांचा तरूण युवक बनून नम्रतेने व प्रेमाने माझी सेवा करीत आहे.

## पाचवी सत्यकथा –

माणसाचे जीवन हे नवग्रहांच्या अंकीत असते. पूर्वजन्मातील कर्मानुसार विशिष्ट ग्रहस्थितीत माणसाचा जन्म होतो. ही विशिष्ट ग्रहस्थिती म्हणजे त्याचे नशीब किंवा दैव होय!

या दैवगतीनुसार माणसाला त्याच्या पूर्वजन्मींच्या कर्माची फळे भोगावी लागत असतात व ज्योतिषी माणसाची कुंडली पाहून त्याची सर्व रहस्ये जाणून भविष्य वर्तवित असतात.

अचूक भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिष्याच्या मनात सूक्ष्म अहंकार असतो. त्यांना असे वाटत असते की, आपल्याला सर्व काही अचूक कळत आहे व याच्या पलीकडे जगात काही नाही. वस्तुत: नवग्रह व सत्तावीस नक्षत्रे यांच्यापलीकडे इच्छाशक्तीचे (Free will) अस्तित्व असून या इच्छाशक्तीच्या प्रांतात स्वच्छंदतेने विहार करणारे योगी स्वत:च्या प्रारब्धात इतरांच्या प्रारब्धात, समाजाच्या प्रारब्धात, देशाच्या प्रारब्धात व जगाच्या प्रारब्धातही स्वत:च्या इच्छेनुसार बदल घडवू शकतात.

इच्छाशक्तीच्याही पलीकडे इतर अनेक शक्तींचे प्रांत आहेत, परंतु प्रस्तुत पुस्तकाचा तो विषय नव्हे.

अचूक भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिष्यांच्या या काही सत्यकथा.

अचूक भविष्य वर्तविणारे म्हणून एक ज्योतिषी अतिशय प्रसिद्ध होते. मोठमोठे लोक त्यांना मान देत असत. ते जरी प्रसिद्ध ज्योतिषी होते तरी त्यांच्या खाजगी जीवनामध्ये त्यांना अनेक समस्या होत्या. त्या त्यांच्या समस्या आपले ज्योतिषशास्त्रीय डोके चालवून सुटत नसत. त्यांच्या मुलीचे लग्न अनेक वेळा जमले व मोडले.

जणूकाही प्रतिक्षण ईश्वर त्यांना सांगत होता– ''ज्योतिष शास्त्रानुसार तू जे काही लोकांना मार्गदर्शन करतोस त्या तुझ्या

वाचेला यश मी देत आहे. हे तुझे ज्ञान नव्हे. तू ज्ञानाचा अहंकार करू नकोस !'' त्या महाशयांना हे कळत नव्हते व त्यामुळे असे का होते? हा प्रश्न त्यांनाही भेडसावत होता.

अचूक भविष्य वर्तविणाऱ्या दुसऱ्या एका ज्योतिषाला एका व्यक्तीने एका सिद्धपुरुषाची कुंडली दाखविली. कुंडलीतील ग्रहांची स्थाने पाहून त्या ज्योतिषाने त्या सिद्धपुरुषाविषयी काही चित्रविचित्र भविष्य वर्तविले. ज्या व्यक्तीने ज्योतिषाला सिद्धपुरुषाची कुंडली दाखविली होती त्याने म्हटले, ''अहो ही सिद्धपुरुषाची कुंडली आहे. तुम्ही काहीतरी कसे बोलता!''

यावर ते ज्योतिषी महाशय म्हणाले –

'सिद्धपुरुष असला म्हणून काय झाले, तो काय नवग्रहांच्या पलीकडे आहे का? मी सांगतो तसेच घडेल!''

त्या ज्योतिषाने सिद्धपुरुषाविषयी जे भविष्य सांगितले ते सर्वच चुकले. मात्र त्यानंतर एक महिन्याने त्या ज्योतिषाचा एकुलता एक मुलगा वारला. त्या मुलाची जन्मकुंडली या ज्योतिषाने स्वत:च बनविली होती. सर्व भविष्यही स्वत:च लिहिले होते. असे का व्हावे हे त्याला कळले नाही. कारण ही ईश्वरीशिक्षा होती.

ईश्वरीशिक्षा कशा होतात, याविषयी अत्यंत थोडक्यात आपण या अध्यायात पाहिले व हे पाहताना सामान्य सज्जन मनुष्य डोळ्यासमोर ठेवून त्याचाच विचार या प्रकरणात केलेला आहे.

'ईश्वरीशिक्षा' या विषयाचा जर आपण सर्वांगीण विचार करावयाचे ठरविले, तर त्यासाठी स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. वाचकांच्या माहितीसाठी काही गोष्टींवर एक दृष्टिक्षेप टाकत आहे.

युद्ध, भूकंप, अपघात, जलप्रलय, अग्निप्रलय, दुष्काळ या सर्व आपत्ती सामूहिक प्रारब्धामुळे येतात.

एखाद्या विशिष्ट परिसरावर जेव्हा ईश्वरीकोप होतो, तेव्हा वरीलपैकी एखादी आपत्ती त्या परिसरावर कोसळते. बुद्धिवादी वाचकांना या गोष्टी पटण्यासारख्या नसल्या, तरी या गोष्टी सत्य आहेत व आणखी शंभर एक वर्षे गेल्यानंतर कदाचित विज्ञानाला याचा शोध लागेल.

सृष्टीमध्ये घडणाऱ्या चांगल्या व वाईट गोष्टींमागे कार्यकारणभाव असतो व त्याचे मूळ अदृश्य सृष्टीत असते हेच खरे !

OOO

# ६. ईश्वरीकृपा कशी होते ?

चांगल्या व वाईट दोन्ही प्रकारच्या माणसांवर ईश्वरीकृपा होत असते.

वाईट माणसाने सुधारावे, सज्जन बनावे म्हणून ईश्वर त्याच्यावर कृपा करतो व त्याला सुधारण्याची संधी पुन्हा पुन्हा देतो. यदाकदाचित वाईट मनुष्य अनेक संधी देऊनही सुधारला नाही, तर अतिशय कठोर शिक्षा होतात.

सज्जन माणसावर ईश्वर सतत कृपेची वृष्टी करतो व तो अधिक सज्जन बनावा, सद्गुणी बनावा, त्याची आध्यात्मात प्रगती व्हावी व त्याला मोक्ष मिळावा अशी ईश्वराची इच्छा असते.

अदृश्य सृष्टीमध्ये करोडो आत्मे सतत फिरत असतात.

यांना अदृश्य मदतनीस असे म्हणतात. इंग्रजीमध्ये Invisible Helpers असे म्हणतात. मानवाच्या मनातील श्रद्धा दृढमूल करण्याचे कार्य हे आत्मे करतात. मानवाच्या अंत:करणात श्रद्धा व भक्ती निर्माण व्हावी म्हणून हे आत्मे विविध प्रकारे प्रयत्न करतात. हे कार्य कसे चालते यावर एक दृष्टिक्षेप –

X ही मुलगी अतिशय सज्जन व प्रेमळ होती. Y ही स्त्री आध्यात्मिक व्यक्ती होती. X मुलीचे या स्त्रीवर खूप प्रेम होते. एकदा Y या आध्यात्मिक स्त्रीने या मुलीला देवीचा मंत्र दिला व जप करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मुलीने श्रद्धेने जप सुरू केला.

एक दिवस ती जप करीत बसली असता Y या स्त्रीच्या रूपामध्ये देवी प्रकट झाली व त्या मुलीला आशीर्वाद देऊन अदृश्य झाली. ही घटना त्या मुलीने त्या स्त्रीस जेव्हा सांगितली तेव्हा तिलाही याचे आश्चर्य वाटले.

अदृश्य सृष्टीतील आत्मे अशा प्रकारचे चमत्कार घडवून मानवातील श्रद्धा दृढमूल करतात. तुमची जिथे श्रद्धा असेल तिथेच ती दृढमूल करण्याचे कार्य अदृश्य सृष्टीतून केले जाते.

श्रद्धा जसजशी वाढत जाते तसतसे ईश्वरीकृपेचे अनुभव जास्त येऊ लागतात; तसेच प्रार्थनाही फलद्रूप होऊ लागतात. म्हणून अदृश्य सृष्टीतील आत्मे सद्‌भक्तांची श्रद्धा वाढविण्याचा प्रयत्न सतत करत असतात. ईश्वरीकृपेची ही पहिली झलक होय.

जसजशी ईश्वरीकृपा वाढू लागते तसतशी यश, सिद्धी

प्राप्त होते. प्रत्येक कार्यात यश येऊ लागते. उद्योग-धंद्यात यश येऊ लागते. सांपत्तिक स्थिती सुधारते. यश व कीर्ती प्राप्त होते. मनुष्य सुखी होतो.

ईश्वरीकृपेचे अनुभव येऊ लागल्यानंतर दानधर्म व परोपकार या गोष्टी तात्काळ सुरू करावयास हव्यात. अर्थात पूर्वी जर करत असाल, तर त्यात वाढ करावयास हवी. असे केले तरच ईश्वरीकृपा वाढत राहते. जर असे केले नाही व ईश्वरीकृपेचा वापर स्वार्थासाठी केला तर ईश्वरीकृपा नष्ट होते व ईश्वरीकृपेने प्राप्त झालेले वैभव निघून जाते. म्हणून कुठल्याही परिस्थितीत स्वार्थ व लोभ यांना थारा देता कामा नये, म्हणजे ईश्वरीकृपेचे पुढील अनुभव येऊ लागतात. ईश्वरभक्ताने स्वार्थ व लोभाला स्थान देता कामा नये; तसेच त्याने कुठल्याही प्रकारचे ढोंग व पाखंडही रचता कामा नये.

स्वार्थ, ढोंग व पाखंड करणाऱ्या व्यक्तीवर ईश्वरीकृपा राहत नाही.

आपल्याला जी चांगली मित्रमंडळी भेटतात, मदत करणारी व सहकार्य करणारी माणसे भेटतात ते ईश्वरीकृपेचे फळ होय.

परगावात, परदेशात, अनोळखी ठिकाणी, अपरिचित व्यक्ती येऊन मदत करतात, हे ईश्वरीकृपेचे फळ होय.

सात्त्विक प्रवृत्तीच्या सत्पुरुषांची दर्शने होणे, तीर्थयात्रा

घडणे हे ईश्वरीकृपेचे फळ होय.

नवरा अथवा बायको चांगली मिळणे, घरात शांतीचे व समाधानाचे वातावरण असणे, ईश्वरभक्ती, दानधर्म, परोपकार, प्रेमळ असे सद्गुण असणे हे ईश्वरीकृपेचे फळ होय.

व्यक्तिगत अथवा कौटुंबिक जीवनात ईश्वरीकृपा कशी अवतरते हे आपण पाहिले. आता सामाजिक जीवनात ईश्वरीकृपा कशी अवतरते यावर एक दृष्टिक्षेप–

निरनिराळ्या रोगांवर संशोधन होऊन त्या रोगांवर औषधे सापडणे ही ईश्वरीकृपा होय.

मानवी जीवन सुखी व समृद्ध करणारी साधने उपलब्ध होणे ही ईश्वरीकृपा होय ! पृथ्वीतलावर शंभर वर्षांपूर्वीचा मनुष्य कसा जगत होता याची आठवण करून आजच्या मानवाने परमेश्वराचे आभार मानावयास हवे व ईश्वराविषयी कृतज्ञता बाळगावयास हवी.

साधनेमध्ये यश मिळणे, आध्यात्मात प्रगती होणे ही ईश्वरीकृपा होय !

जुलूमशाही नष्ट होणे, प्रजेचे राज्य येणे ही ईश्वरीकृपा होय !

भरपूर पाऊस पडून विपुल पीक येणे, सर्वत्र सुजलाम् सुफलाम् होणे ही ईश्वरीकृपा होय !

ईश्वरीकृपा अशा प्रकारे मानवी जीवनामध्ये सर्वत्र दिसून येते; परंतु मानव जेव्हा उन्मत्तपणे वागून ईश्वराने दिलेल्या

सुखसंपत्तीचा दुरुपयोग करतो तेव्हा पृथ्वीतलावर विविध प्रकारच्या आपत्ती कोसळतात.

समजा एखाद्याच्या घरी तुम्ही पाहुणे म्हणून गेलात, तेथे बेताल वागला, काही तोडफोड केली तर तो यजमान तुम्हाला हाकलवून लावेल. शक्य झाल्यास दोन-चार श्रीमुखात ठेवून द्यायलाही कमी करणार नाही. अगदी त्याचप्रमाणे-

'हे संपूर्ण विश्व ईश्वराच्या मालकीचे असून, आपण या विश्वामध्ये पाहुणे म्हणून आलेले असतो. आपल्या लायकीप्रमाणे येथे आपला पाहुणचार होत असतो. आपण जर ताळतंत्र सोडून वागू लागलो, तर ईश्वर आपल्याला जबर शिक्षा करेल याची जाणीव ठेवावयास हवी.'

सज्जन, प्रेमळ, भक्तिमान व सरळ मनाच्या माणसांवर ईश्वरीकृपेचा कसा वर्षाव होत असतो याची काही उदाहरणे आपण येथे पाहू, म्हणजे ईश्वर खरेच किती करूणेचा सागर आहे हे आपल्या लक्षात येईल.

अत्यंत सरळ व सात्त्विक मनाचे एक कुटुंब होते. परिस्थिती अतिशय गरिबीची होती. कुटुंबातील वृद्ध कुटुंब प्रमुखाच्या पायाला जखमा झाल्याचे निमित्त होऊन तेथे गँगरीन झाले. डॉक्टरने पाय कापून टाकण्याचा सल्ला दिला. घरातील सर्वांनी श्री स्वामी समर्थांचा धावा सुरू केला व त्यांच्यावर भार टाकून ते स्वस्थ राहिले.

एक दिवस त्यांच्या घरी दुपारच्या वेळी एक साधू आला.

या सद्‌भक्ताने त्या साधूला जेवणाचा आग्रह केला. साधूने घरात येऊन गँगरीन झालेल्या व्यक्तीची आस्थेने चौकशी केली व म्हणाला, ''याच कामासाठी मला देवाने येथे पाठविले आहे.'' असे म्हणून त्या साधूने ती गँगरीनची जखम चोखावयास सुरुवात केली. घरातील सर्व माणसे आश्चर्यचकित होऊन हा प्रकार पाहत राहिली. सुमारे एक मिनिटभर ही जखम चोखत राहिला. नंतर त्यावर एक ग्लास पाणी पिऊन पोटभर जेवून तो साधू निघून गेला.

सहा-सात दिवसांत ती जखम पूर्ण बरी झाली.

ईश्वरी करुणेच्या हजारो गोष्टी आपल्याला श्री अक्कलकोट स्वामींचे चरित्र, गुरुचरित्र, तसेच इतर अनेक साधू-संतांची चरित्रे वाचल्यावर माहिती होतील. ईश्वर सतत कृपेचा वर्षाव करतच असतो. आपण मनाने सरळ व नि:स्वार्थ असावयास हवे म्हणजे ईश्वरीकृपेचे दिव्य अनुभव नेहमी येत राहतात.

पृथ्वीतलावर आतापर्यंत जितके साधू झाले त्या सर्वांनी मानवांना प्रेम, परोपकार, भक्ती, दया, सरलता, मानवता यांचे आचरण करण्याचा उपदेश केलेला आहे. सर्व साधू-संतांचे हेच सांगणे आहे, मानवाने नि:स्वार्थ बुद्धीने राहावे व परोपकार करावा म्हणजे मानवी जीवन खऱ्या अर्थाने सुखी होईल.

**अनित्यानि शरीराणि । वैभवं नैवशाश्वतम् ।**
**नित्य सन्निहतो मृत्युः । कर्तव्यं धर्म संग्रहः ॥**

शरीर हे  अनित्य आहे. वैभव शाश्वत नाही. कुठल्या क्षणी मृत्यू येईल, हे सांगता येत नाही. म्हणून प्रत्येक क्षणाला काहीतरी पुण्य गोळा करत राहिले पाहिजे.

○○○

# ७. कर्मयोनी – भोगयोनी

## कर्मयोनी

मानवयोनीत जन्म घेणे म्हणजे कर्मयोनीत जन्म घेणे होय! मानवयोनीत जन्म घेतल्यानंतर मानवाला त्याच्या प्रत्येक चांगल्या-वाईट कर्माचे फळ भोगावे लागते. ही कर्म व कर्मफलाची शृंखला शेकडो जन्म चालत राहते. कर्मे जर चांगली असतील, तर पुन्हा पुन्हा मानवजन्म मिळतो व कर्मे जर वाईट असतील तर मानवेतर योनीतही जन्म घ्यावा लागतो.

मानवजन्माला किंवा कर्मयोनीला अतिशय श्रेष्ठ मानले जाते, कारण येथे सत्‌कर्म करून श्रेष्ठ गतीला किंवा सद्‌गतीला जाता येते. मानवेतर योनीतील सर्व आत्मे मानवजन्म प्राप्त व्हावा

म्हणून ईश्वराची प्रार्थना करत असतात. शेवटी ईश्वराची कृपा होते व मानवजन्म प्राप्त होतो.

आत्म्याला मानवजन्म प्राप्त होण्याच्या अगोदर ईश्वराकडून त्याला सूचना मिळते की, तुला मानवजन्म प्राप्त होणार आहे. यावेळी त्याला अतिशय आनंद होतो. आपल्याला उद्धाराचा मार्ग मिळणार म्हणून तो अतिशय आनंदित होतो. जन्माच्या अगोदर तो विविध प्रकारच्या कल्पना करतो. पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर मी दानधर्म करीन, परोपकार करीन, आयुष्याचा एकही क्षण फुकट घालवणार नाही, जास्तीत जास्त आध्यात्मिक उन्नती करून देवयान मार्गात म्हणजे मोक्षमार्गात जास्तीत जास्त प्रगती करीन असे तो ठरवितो. अखेरीस आत्म्याला मानवजन्म प्राप्त होतो व मानवजन्म प्राप्त झाल्यानंतर तो काय करतो हे मी तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. वाचकांनी स्वत:च्याच अंतरंगात डोकावून आपण काय करतो ते पाहावे.

साधना करणाऱ्या साधकांना बऱ्याच वेळा भूत, प्रेत, पिशाच्च, क्षुद्र देवता, अर्ध-देवता असे आत्मे भेटतात व ते आम्हाला मुक्ती द्या म्हणजे मानवजन्म द्या असे विनवितात. मानवजन्म मिळाल्यानंतर आम्ही सत्कर्मे करून सद्गती प्राप्त करू अशी आश्वासनेही देतात. काही आत्मे तर आम्हाला आता मनुष्यजन्म मिळणार आहे, जन्माला आल्यानंतर आमचा सांभाळ करा, असे सत्पुरुषांना विनवितात. मानवजन्माचे महत्त्व जे मानव

नाहीत त्यांना अतिशय चांगल्या रितीने माहीत असते. स्वर्गलोकातील देवसुद्धा आम्हास मानवजन्म मिळाल्यास आम्ही आध्यात्मात अतिशय वेगाने प्रगती करू असे म्हणतात. कारण मनुष्य एक वर्षात जेवढी आध्यात्मिक प्रगती करतो तेवढी आध्यात्मिक प्रगती स्वर्गलोकात होण्यास एक हजार वर्षे लागतात. मानवजन्माचे महत्त्व इतके अनन्यसाधारण आहे की, त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही.

पृथ्वीतलावर मानव म्हणून जन्माला आल्यानंतर मात्र 'आपण कोण?' 'कोठून जन्माला आलो?' 'का जन्माला आलो?' 'कशासाठी जन्माला आलो?' 'मृत्यूनंतर जाणार कोठे?' इत्यादी सर्व प्रश्नांचा त्याला विसर पडतो व तो कर्मशृंखलेच्या जाळ्यात असा काही अडकतो की, त्याची मरेपर्यंत सुटका होत नाही. सुटण्याची इच्छा त्याला होत नाही. उलट करू नयेत अशा कितीतरी गोष्टी तो करतो व कितीतरी गोष्टी त्याला पोटासाठी कराव्या लागतात. या सर्वांवर ताण म्हणजे आपला उद्धार व्हावा, असे त्याला कधीही वाटत नाही.

मानवाला त्याच्या मूळ स्वरूपाची जाणीव व्हावी, तो पृथ्वीतलावर कशासाठी आला आहे याची त्याला आठवण व्हावी म्हणून साधू-संतांनी हजारो ग्रंथ लिहून ठेवले आहेत; परंतु मानवाला सद्ग्रंथ वाचण्याची बुद्धी होत नाही.

ईश्वराचे नामस्मरण करण्यात काहीच खर्च होत नसतो;

पण मानवाला हे फुकटचे ईश्वर नामस्मरण करण्याचीसुद्धा बुद्धी होत नाही.

प्राणायाम करण्यामध्ये काहीच खर्च होत नसतो; परंतु मानवाला प्राणायाम करण्याचीही बुद्धी होत नाही.

भिकाऱ्याला पैसे देणे अथवा दान करणे हे त्याला कमीपणाचे वाटू लागते.

अशा प्रकारे स्वत:चा उद्धार व्हावा म्हणून कर्मयोनीत म्हणजे मानवयोनीत जन्माला आलेला आत्मा स्वत:ची अधोगती करून घेतो व मृत्यूनंतर हजारो वर्षे आपण केलेल्या कर्माच्या शिक्षा भोगत राहतो.

मानवजन्म ही आत्म्याला परमेश्वराने दिलेली एक फार मोठी संधी आहे. मानवदेह हे परमेश्वराकडे जाण्याचे एकमेव साधन आहे. मानवदेह हे वाहन आहे. या वाहनात बसून आत्म्याने ईश्वराकडे जावयाचे असते. ईश्वराच्या दिशेने प्रवास करावयाचा असतो. ईश्वराच्या दिशेने थोडा जरी प्रवास केला, तरी ईश्वर अशा आत्म्याला पुन्हा मानवजन्म देतो व पूर्वजन्मी जेथपर्यंत प्रवास पूर्ण झालेला असेल त्या टप्प्यापासून त्या आत्म्याचा पुढे प्रवास सुरू होतो.

## भोगयोनी

पशू, पक्षी, प्राणी, वृक्ष या सर्वांना भोगयोनी म्हटले जाते. येथे आत्मा फक्त आपल्या प्रारब्धाचा भोग भोगत असतो.

भोगयोनीतील जीवांना संचित व प्रारब्ध असते; परंतु क्रियामाण कर्म नसते.

आपल्या प्रारब्ध कर्मानुसार एखादा कुत्रा रोल्सराईस गाडीतून फिरतो, तर दुसरा कुत्रा आपल्या प्रारब्धानुसार उकिरड्यावर काही खावयास मिळते का हे शोधत असतो.

आपल्या प्रारब्धानुसार एक वाघ जंगलात फिरतो, तर दुसरा वाघ सर्कशीतील पिंजऱ्यात अडकलेला असतो.

आपल्या पूर्वकर्मानुसार बैल चाबकाचे फटके खात ओझी वाहत असतात, ते आपण सर्व पाहतोच; पण एखादा भाग्यवान बैल असाही असतो की, तो देवस्थानाला अर्पण केलेला असतो, त्यामुळे सगळे लोक त्याला नमस्कार करतात.

गाय, बैल हजारोंच्या संख्येने कत्तलखान्यात पाठविले जातात, हे त्यांचे प्रारब्ध. फारच थोड्या गाई, बैल नैसर्गिकरित्या मरतात.

अशा प्रकारे सर्व प्राणी आपआपल्या प्रारब्धाचे भोग भोगत असतात. यातील बरेचसे प्राणी पूर्वजन्मात मनुष्य असतात. मनुष्यजन्माचा त्यांनी दुरुपयोग केलेला असतो व म्हणून ते या जन्मात शिक्षा भोगत असतात.

अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ हिमालय पर्वतामध्ये काही योग्यांना वेदातील गूढ रहस्ये समजावून सांगत होते. ते ज्या गुहेत बसले होते त्या गुहेच्या बाहेर दोन वाघ अंधारात बसून ही

वेदान्त चर्चा ऐकत होते.

श्री स्वामी समर्थांनी त्या दोन्ही वाघांना हाक मारून आपल्याजवळ बोलाविले. आपल्याजवळ त्या वाघांना बसवून श्री स्वामी समर्थांनी त्या शिष्यांना सांगितले,

''हे वाघ पूर्वजन्मी पंडित होते. हत्तींच्या पाठीवर ग्रंथांचे ढिगारे लावून देशोदेशी विजयपत्रे घेत फिरत असत. त्या कर्मामुळे यांना व्याघ्र जन्म प्राप्त झाला. पूर्वजन्मी ज्ञानाच्या गर्वाने फुगून हे उन्मत्त झालेले होते. उन्मत्तपणाची शिक्षा हे आता भोगत आहेत.''

असे म्हणून स्वामी समर्थांनी त्या दोन्ही वाघांकडे कृपादृष्टीने पाहिले. तात्काळ त्या दोन्ही वाघांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या व ते स्वामी चरणांवर लोळू लागले.

अक्कलकोट येथे एकदा एक हत्ती पिसाळला. त्याच्या चारही पायांना साखळदंड बांधलेला असतानाही सोंडेने आसपासचे दगड उचलून तो लोकांना मारू लागला. साखळदंड तोडून तो आता गावात उत्पात माजवील, असे सर्वांना वाटू लागले. अक्कलकोटच्या राजाने श्री स्वामी समर्थांना सांगितले,

''महाराज ! हत्ती खूप पिसाळला आहे, तो अनेकांचे प्राण घेईल. त्याला गोळी घालून ठार करावे असे माझे मत आहे.''

यावर श्री स्वामी समर्थ म्हणाले,

''अरे त्याला मारू नको ! मी त्याला ताळ्यावर आणतो.'' असे म्हणून श्री स्वामी हत्तीसमोर गेले व त्या हत्तीला म्हणाले,

''मूर्खा माजलास काय? पूर्वजन्मीचे स्मरण विसरलास वाटते?''

श्री स्वामी समर्थांच्या मुखातील हे शब्द ऐकताच त्या हत्तीला आपल्या पूर्वजन्मीचे स्मरण झाले असावे.

हत्तीने आपले गंडस्थळ जमिनीला टेकून स्वामींना नमस्कार केला व त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले व तो मदोन्मत्त हत्ती गाईप्रमाणे शांत झाला.

पशू, पक्षी, प्राणी यांच्या रूपाने आत्मा आपल्या प्रारब्धाचे भोग अशा प्रकारे भोगत असतो म्हणून या योनींना भोगयोनी असे म्हणतात.

# ८. थोडे अद्‌भुत, थोडे गूढ

## परलोकाशी संपर्क

परलोकात अनेक स्तर असून, आपल्या पात्रतेनुसार विविध प्रकारचे आत्मे विविध स्तरांवर राहत असतात. उच्च स्तरांवर देव-देवता, योगी व पुण्यवान आत्मे राहत असतात. परदेशामध्ये या विषयावर संशोधन चालू असून, आणखी शंभर एक वर्षांनी परलोकातील आत्म्यांबरोबर संपर्क साधून त्याची संपूर्ण माहिती मानवाला उपलब्ध करून देणारी सेंटर्स ठिकठिकाणी उघडली जातील. सामान्य मनुष्य या सेंटर्समध्ये जाऊन आपल्या पूर्वजांच्या इच्छा, आकांक्षा जाणून घेऊन त्या पूर्ण करू शकेल.

परलोकातील पूर्वजांचे आत्मे तृप्त व संतुष्ट झाल्यावर

सामान्य मनुष्याच्या जीवनातील अडीअडचणी दूर होतील व त्याची आध्यात्मिक प्रगती वेगाने होऊ लागेल; तसेच परलोकातील आत्म्यांच्या सद्‌गतीमध्ये जे अडथळे गेल्या शंभर वर्षांत निर्माण झाले आहेत तेही दूर होऊन त्यांच्या उद्धाराचा मार्ग मोकळा होईल.

## माणसाची उंची

इतिहासाकडे नजर टाकली असता असे लक्षात येते की, माणसाची उंची आणि बळ हे कमी कमी होत जात आहे. असे म्हणतात की, कृतयुगातील माणसे २८ फूट उंच होती. कृतयुगाच्या अंती व त्रेतायुगाच्या सुरुवातीला माणसाची उंची बावीस फूट झाली. त्रेतायुगाच्या अंती व द्वापारयुगाच्या सुरुवातीला माणसाची उंची चौदा फूट झाली. अशा प्रकारे माणसांची उंची व शक्ती कमी कमी होत पाच हजार एकशे दोन वर्षांपूर्वी म्हणजे द्वापारयुगाच्या अंती व कलियुगाच्या सुरुवातीला माणसाची उंची सात ते आठ फूट झाली. सध्या कलियुग सुरू असून कलियुगाची पाच हजार एकशे दोन वर्षे पूर्ण झालेली आहेत. सध्या माणसाची उंची सरासरी साडेपाच ते सहा फूट आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

असे म्हणतात की, कलियुगाच्या अंती माणसाची उंची सात इंच ते एक फूट एवढी होईल, तर काही प्राचीन ग्रंथांत असे

म्हटले आहे की, कलियुगाच्या अंती माणसाची उंची अंगठ्याएवढी म्हणजे सुमारे दोन इंच होईल. वांग्याच्या झाडाला तसेच मिरचीच्या झाडाला त्या काळातील मनुष्य शिडी लावून त्यावर चढून वांगी व मिरच्या तोडेल.

## ऋषी

असे म्हणतात की हिमालय, उत्तर ध्रुव, निलगिरी, सह्याद्री, श्रीशैल इत्यादी पर्वतांमध्ये प्राचीनकालीन ऋषी अद्याप तपस्या करत आहेत. हिमालयामध्ये प्राचीनकालीन शस्त्रास्त्रे, यंत्रे व गूढविद्यांवरील ग्रंथ अद्याप सुरक्षितरित्या जपून ठेवलेले आहेत.

काही साधू-संतांचे म्हणणे असे आहे की, पृथ्वीवरील पाप नष्ट झाल्यानंतर गुप्तरूपाने राहणारे पुण्यात्मे पृथ्वीतलावर परत अवतार धारण करतील. प्राचीनकालीन शस्त्रास्त्रे, मंत्रविद्येने वापरता येणारी दिव्य अस्त्रे आणि अनेक गुप्त व गूढ विद्यांचा पुनश्च प्रचार व प्रसार पृथ्वीतलावर होऊ लागेल. हा प्रसार व प्रचार करण्याचे काम हे अवतारी महात्मे करतील. निरनिराळ्या विद्यांचा विकास या काळात होईल.

## पृथ्वीचा आस

पृथ्वीचा आस हळूहळू कलत असून, इ.स. २०४०

पर्यंत पृथ्वी तीस अंशांनी कलेल, असे काही दिव्यदृष्टी संपन्न लोकांचे म्हणणे आहे. असे झाल्यास पृथ्वीचा समुद्रकिनाऱ्यालगतचा भाग पाण्यात जाईल. समुद्र एक ते दीड मैल पुढे येईल. काही ठिकाणी समुद्रातील जमीन वर येईल, तर काही ठिकाणी जमिनीवर समुद्र येईल.

पृथ्वीवरील वातावरण बदलून जाईल. कडक उन्हाळा, अति पावसाळा व अति थंडी असे काही विचित्र वातावरण पृथ्वीवर निर्माण होईल. कॅनडाच्या आसपास जे विस्तीर्ण जलाशय आहेत त्या परिसरातील बर्फ या विचित्र वातावरणामुळे वितळून समुद्रातील पाण्याची उंची वाढेल.

१९९४ नंतर दरवर्षी कुठे ना कुठे मोठमोठाले भूकंप होत राहतील व या भूकंपामध्ये प्रचंड जनहानी होईल.

## नाडीग्रंथ

तमिळनाडू राज्यातील मद्रास, तांबरम, कांचीपुरम, वैद्येश्वरन कोईल, इत्यादी शहरांमध्ये प्राचीन नाडीग्रंथ असून, या नाडीग्रंथांमध्ये पृथ्वीतलावरील जवळजवळ सर्व मानवांची भविष्ये लिहिलेली आहेत. एकट्या वैद्येश्वरन कोईल गावामध्ये अठरा नाडीग्रंथ आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे

१) ईश्वरनाडी, २) वशिष्ठनाडी, ३) शुकनाडी, ४) बुधनाडी, ५) ध्रुवनाडी, ६) शुक्रनाडी, ७) भृगुनाडी, ८) सूर्यनाडी,

९) नंदीनाडी, १०) काकनाडी, ११) नारदनाडी, १२) अगस्त्यनाडी, १३) कौशिकनाडी, १४) चंद्रनाडी, १५) अरुणनाडी, १६) सत्यनाडी, १७) भीमनाडी, १८) अत्रिनाडी.

दक्षिण हिंदुस्थानातील या ग्रंथांमध्ये मानवांची अनेक जन्मांची भविष्ये लिहिलेली असतात. पुष्कळवेळा पुढील जन्म कोणते येणार हेही सांगितले जाते. सुमारे सात ते आठ हजार वर्षांपूर्वी हे ग्रंथ ताडपत्रावर ऋषींनी लिहिलेले आहेत. भविष्यकाळात जन्माला येणाऱ्या प्रत्येक आत्म्याचे वर्णन या ग्रंथांमध्ये सविस्तर केलेले आहे. यातील वर्णने ऐकून आपण आश्चर्यचकित होतो.

पुष्कळवेळा या ग्रंथांमध्ये ग्रंथाचे वाचन करणाऱ्या पंडिताला काही सूचना ग्रंथकर्त्या ऋषींकडून येतात. या सूचनेची वाक्ये ताडपत्रावर त्याला दिसू लागतात व पंडित आपल्याला त्या सूचना सांगतो. हे सर्व प्रकार आश्चर्याने थक्क करतात.

ज्या ताडपत्रावर हे ग्रंथ लिहिलेले आहेत ती ताडपत्रे फूटपट्टीच्या आकाराची असतात. सुमारे एक ते दीड इंच रुंद व आठ ते नऊ इंच लांब अशा आकाराची ही ताडपत्रे दोऱ्यामध्ये ओवलेली असतात. आपण आपले जन्मनक्षत्र सांगताच त्या जन्मनक्षत्राशी संबंधित असणारा ताडपत्रांचा गठ्ठा पंडित बाहेर काढतो. आपले विशिष्ट पान तो शोधून काढतो व वाचायला सुरुवात करतो. सुमारे दहा-पंधरा मिनिटे तामीळ भाषेत तो ग्रंथपठण करतो व थांबतो. या पंधरा मिनिटात त्याने जे काही

सांगितले त्याचा इंग्लिश सारांश आपल्याला त्याचा सहाय्यक तीन-चार मिनिटात सांगतो. तद्नंतर तामीळ पंडित वाचायला सुरुवात करतो. अशा प्रकारे सुमारे एक तासभर वाचन चालते. या नाडीग्रंथांमध्ये कर्मविपाककांड किंवा कर्मदोषनिवारककांड नावाचे काही स्वतंत्र ग्रंथ असून, या ग्रंथांमध्ये आपल्या कर्मांचे दोष निवारण कसे करावे यासंबंधी माहिती दिलेली असते. सध्या आपण कुठल्या प्रकारचे क्लेश भोगत आहोत, पूर्वजन्मीच्या कुठल्या कर्मांमुळे हे भोगावे लागत आहेत, कुठले उपाय केले असता या कर्मभोगातून आपली सुटका होईल, अशी सर्व माहिती त्या ग्रंथांत लिहिलेली असते. ते ऐकताच मन थक्क होते.

पंजाबमधील होशियारपूर येथेसुद्धा अनेक नाडीग्रंथ आहेत असे म्हटले जाते. या नाडीग्रंथांना तिकडे संहिता असे म्हणतात. भृगुसंहिता हा उत्तर हिंदुस्थानात प्रसिद्ध ग्रंथ आहे.

भारद्वाज संहिता या ग्रंथामध्ये विमाने कशी निर्माण करावीत याची वर्णने असून, विविध प्रकारच्या विमानांचे आराखडेही दिलेले आहेत. अगस्ती संहिता ग्रंथामध्ये पाण्यापासून वीज कशी निर्माण करावी याचे वर्णन केलेले आहे. याला त्यांनी मित्रावरुणप्रकटीकरण असे म्हटले आहे. येथे मित्र म्हणजे वीज व वरुण म्हणजे पाणी. आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये अशा विविध प्रकारचे ज्ञान भरलेले आहे.

दक्षिण हिंदुस्थानातील नाडीग्रंथांचे आणखी एक वैशिष्ट्य

म्हणजे तुमच्या जीवनात ज्या ज्या गोष्टी भूतकाळात घडून गेलेल्या आहेत त्या सर्व गोष्टी ते शास्त्री-पंडित भूतकाळातील गोष्टी वाचल्याप्रमाणे वाचतात व ज्या गोष्टी भविष्यकाळात घडावयाच्या आहेत त्या सर्व गोष्टी भविष्यकाळ वापरून वाचतात.

दक्षिण भारतातील नाडीग्रंथ हे एक भारतातील मोठे आश्चर्य व गूढ आहे. काही नाडीग्रंथवाल्यांचे पत्ते पुढे देत आहे. यातील रमणी गुरुजी हे काहीही पैसे न घेता नाडीग्रंथ वाचन करतात, तर इतर सर्व पैसे घेतात.

**नाडीग्रंथवाल्यांचे पत्ते**

**१) काका भुजंदर नाडी**

रमणी गुरुजी
भारती इंजिनिअरिंग कॉलेजजवळ, तांबरम ईस्ट
चेन्नई (मद्रास)

यांच्याकडे काकभृशुंडी ऋषींनी लिहिलेला नाडीग्रंथ असून, तामीळ भाषेमध्ये या ग्रंथाला काका भुजंदर नाडीग्रंथम् असे म्हणतात; तसेच काकभृशुंडी ऋषींना तमीळ भाषेमध्ये काका भुजंदर ऋषिगोळ असे म्हणतात. या ग्रंथामध्ये मानवाच्या अनेक पूर्वजन्मांची तसेच पुढील जन्मांचीही वर्णने आहेत.

रमणी गुरुजी सकाळी सात ते नऊ व संध्याकाळी सात ते नऊ या काळात ग्रंथ वाचन करतात. आपले जन्मनक्षत्र

सांगिल्यावर ते भविष्य सांगतात.

**२) मीनाक्षी नाडी**

प्रो. ए. एन. के स्वामी,
८३, कुट्टचेरी रोड, ई-१
मैलापूर पोलिस स्टेशनसमोर
चेन्नई (मद्रास).

यांच्याकडे मीनाक्षी नाडी असून, दुपारी तीननंतर शास्त्री भविष्यकथनाचे कार्य फी घेऊन करतात. आपले जन्मनक्षत्र यांना सांगावे लागते.

**३) अगस्तेर नाडी**

मोहन सुंदरम
१९ न्यू बंगलो स्ट्रीट, चिंताद्रीपेट
चेन्नई (मद्रास)

मोहन सुंदरम हे गृहस्थ जवळजवळ ८५ वर्षांचे असून, त्यांच्याकडे अगस्तीनाडी हा ग्रंथ आहे. मोहन सुंदरम यांना तेलगू भाषा थोडी येते; परंतु हिंदी व इंग्रजी अजिबात येत नाही. यांनाही आपले जन्मनक्षत्र सांगावे लागते.

**४) अगस्तेर नाडी**

अगस्त ज्योतिष निलयम
दुराई सुब्रीथनम
३६, न्यू स्टेट बँक कॉलनी,

फिलिप्स हॉस्पिटलच्या मागे,

तांबरम वेस्ट, चेन्नई (मद्रास).

दुराई सुब्रीथनम हे अंगठ्याच्या ठशावरून भविष्य सांगतात. भरपूर फी घेतात. काही काही नाडीग्रंथ वाचन करणारे एक ते दहा हजारांपर्यंत फी घेतात, म्हणून वाचकांनी आपल्याला शक्य असेल त्याच नाडीग्रंथवाल्याकडे जावे. दुराई सुब्रीथनम यांच्याकडे खूप दूरदूरहून लोक येत असतात व नेहमी खूप गर्दी असते.

**५) इरट्टै नाडी**

ॐ उलगनाथन

आंडवर कोईल स्ट्रीट, वडपळणी

चेन्नई (मद्रास)

ॐ उलगनाथन यांच्याकडे इरट्टै नाडी नावाचा नाडीग्रंथ असून, यांच्या अंगात कुठल्यातरी ऋषींचा संचार होतो व हा संचार बरेच काही सांगतो; परंतु याची फी खूपच असल्याने सामान्य मनुष्य यांच्याकडे जात नाही. मोठमोठे राजकारणी लोक यांच्या पाठीमागून फिरत असतात.

**६) कौशिक नाडी**

कांचीपुरम

कांचीपुरम मद्रास रस्त्यावर कांचीपुरमपासून पाच कि. मी. अंतरावर हा नाडीग्रंथ एका पंडिताकडे असून, येथेही

भविष्यकथनाचे कार्य केले जाते.

बंगळूरमध्ये शुकनाडी नावाचा ग्रंथ असून, तेथेही नाडीग्रंथातून भविष्य सांगितले जाते.

**७) शुकनाडी**

सच्चिदानंद मूर्ती

३३, नाडीगृह, ५, मेन रोड, कामराज पेठ, बंगळूर

## वैद्येश्वरन कोईल

वैद्येश्वरन कोईल या गावामध्ये एकूण अठरा नाडीग्रंथ असून, यांतील कोणाकडेही आपण आपले भविष्य पाहू शकतो. हे शास्त्री प्रथम आपल्या अंगठ्याचा ठसा घेतात व अंगठ्याच्या ठशावरून ताडपत्रांच्या पट्ट्यांमधून ते आपली पट्टी शोधून काढतात व त्यावरून भविष्यकथन करतात.

अशा प्रकारे संपूर्ण दक्षिण हिंदुस्थानात ठिकठिकाणी नाडीग्रंथ असून, नाडीग्रंथांचे वाचन केले जाते. यापैकी अनेकांना मी स्वत: भेटलेलो आहे.

पंजाबमधील होशियारपूर या गावी अनेक नाडीग्रंथ असून, तिकडे नाडीग्रंथांना भृगुसंहिता, सूर्यसंहिता असे म्हणतात; परंतु या नाडीग्रंथवाल्यांना भेटण्याचा योग आला नाही व भेटण्याची आता इच्छाही नाही; परंतु नाडीग्रंथवाले अतिशय अचूक भविष्य

सांगतात एवढे मात्र खरे ! यांतील काहींना सध्या धनाचा लोभ सुटलेला आहे, तर काही ठिकाणी नाडीग्रंथाच्या नावाने चक्क पिशाच्च विद्यांचा वापर केला जातो, हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. अशा जागी जाऊन त्रास झाल्याने शेवटी नाडीग्रंथवाल्यांकडे जाणे सोडून दिले. नाडीग्रंथ म्हणजे काय? ते कसे असतात? त्यांचे गूढ काय? इत्यादी विषयांची माझी जिज्ञासा शांत झालेली होती.

पुष्कळ ठिकाणी जेथे नाडीग्रंथाचे वाचन चालत असे त्या ठिकाणी नाडीग्रंथ वाचकाच्या शरीरात तिसऱ्या लोकातील आत्मा येऊन बोलत आहे, असेही आढळून आले. एकूण नाडीग्रंथवाल्यांपैकी मीनाक्षी नाडीवाले श्री. ए. एन. के. स्वामी व रमणी गुरुजी मला खूपच चांगले वाटले. यांपैकी रमणी गुरुजी तर काहीही पैसे वगैरे घेत नाहीत, तर मीनाक्षी नाडीवाले ए.एन.के. स्वामी हजार रुपये घेतात व व्यवस्थित कॅसेट वगैरे करून देतात. इतर लोकांच्या बाबतीत माझे मत फारसे चांगले नाही. काही ठिकाणी चक्क पिशाच्च विद्या आहे. तेथे गेल्याबरोबर सात्त्विक माणसाला त्रास होतो, तर काही ठिकाणची पिशाच्चे इतकी हलक्या दर्जाची असतात की, साधक व्यक्तीला पाहिल्याबरोबर ती पळून जातात व नाडीग्रंथवाल्यांची त त प प करायची वेळ येते. काही ठिकाणी मात्र खूपच चांगले अनुभव येतात. कारण तेथे देवता अथवा ऋषी प्रत्यक्ष बोलत असतात.

जेथे देवता अथवा ऋषी प्रत्यक्ष बोलत असतात, अशा नाडीग्रंथांना जीवनाडी असे म्हणतात. रमणी गुरुजी यांना तर काकभृशुंडी ऋषींचा अंशावतार मानले जाते. ते तर अगदी सत्पुरुषच आहेत. त्यांच्या हातून अनेकांचे कल्याण होत असते.

मीनाक्षी नाडीवाले ए.एन.के. स्वामी हेसुद्धा खूपच चांगले सद्गृहस्थ असून, यांच्या मुखाने अगस्ती ऋषी बोलत असतात.

मोहन सुंदरम यांच्याकडेही जीवनाडी असून, यांच्या मुखानेही एक चांगल्या प्रतीचा आत्मा बोलत असतो; परंतु यांच्याजवळ फारशी पुण्याई नसल्याने यांची आर्थिक स्थिती बेताचीच वाटते. वरील तीनही ठिकाणी माणसाचे पूर्ण समाधान होते. पैकी मोहन सुंदरम आता हयात नसावेत. कारण मी जेव्हा भेटलो तेव्हा ते फारच वृद्ध गृहस्थ होते. इतर ठिकाणांविषयी माझे फारसे अनुकूल मत नाही. काही ठिकाणी तर निरनिराळ्या कारणांच्या नावाखाली पैसे उकळण्याचा धंदा केला जातो. अर्थात प्रत्येक क्षेत्रामध्ये काही चांगले, तर काही वाईट लोक हे असायचेच ! तर असे हे भारतातील नाडीग्रंथ एक अद्भुत आश्चर्य आहे. याविषयी संशोधन होणे अतिशय आवश्यक आहे.

## दिव्य तलाव

हिमालयातील कुशली नावाच्या गावात एक दिव्य तलाव आहे. यात्रेकरू उत्तरकाशी, भटवाडी, झाला, जसपूर या मार्गावरून

कुशली गावामध्ये जातात. या दिव्य तलावाला लोक शंकर तलाव असेही म्हणतात. येथे पार्वतीदेवीने तपस्या केली होती. येथे देवता स्नानासाठी येतात, याच्या किनाऱ्यावर विहार करतात म्हणून याला दिव्य तलाव असे म्हणतात.

या तलावात स्नान करणे, कपडे धुणे, हात-पाय धुणे, खरकटी भांडी धुणे इत्यादी गोष्टी करण्यास मनाई आहे. या तलावाच्या तळाशी शिवमंदिर आहे. ज्या कोणाचे काम होणार असेल, त्याने तलावात पैसा टाकला, तर तो पाण्यावरून तरंगत वाहत जाऊन शिवलिंगावर जाऊन पडतो आणि ज्याचे काम होणार नाही त्याचा पैसा परत येऊन टाकणाऱ्याच्या पायाजवळ पडतो.

सद्भक्त लोक या तलावात दूध सोडतात. दूध सोडल्याबरोबर दुधाची धार बनते व पाण्यातून ती दुधाची धार प्रवास करत पुढे जाते व शिवलिंगावर जाऊन पडते.

एखाद्याचे जर काम होणार नसेल, अथवा देवता रागावलेली असेल, तर दूध परत जमिनीवर येऊन पडते.

## मातीची घागर

पुण्यापासून सुमारे शंभर कि.मी. अंतरावर निघोण नावाचे एक गाव आहे. येथे चैत्र महिन्यात फार मोठी जत्रा भरते. चैत्र नवमीला तेथील विहिरीतून मातीची घागर वर येते व पाण्यावर

आपोआप तरंगू लागते. गेली शेकडो वर्षे हा प्रकार सुरू आहे.

असे म्हणतात की, कृतयुगामध्ये या विहिरीतून सोन्याची घागर बाहेर येत असे. त्रेतायुगामध्ये या विहिरीतून चांदीची घागर बाहेर येऊ लागली. द्वापारयुगामध्ये या विहिरीतून तांब्याची घागर येत होती. कलियुगाच्या सुरुवातीला या विहिरीतून पितळ्याची घागर बाहेर येत होती. गेली सुमारे हजार वर्षे या विहिरीतून मातीची घागर बाहेर येत आहे.

ठीक चैत्र शुद्ध नवमीला मातीची घागर पाण्यातून वर कशी येते व पाण्यावर तरंगत कशी राहते याचे गूढ अद्याप कोणालाही उकलले नाही.

## दारू पिणारा भैरव

मध्य प्रदेशातील उज्जैन येथील भैरव मंदिरातील मूर्ती चक्क दारू पिते. पुजारी एका चांदीच्या ताटात दारू ओततो व मूर्तीच्या तोंडाजवळ दारू नेताच मूर्तीतील भैरव गटागटा दारू पितो. एका क्षणात ताटातील दारू अदृश्य होते व पाहणाऱ्यास फार मोठे आश्चर्य वाटते.

## दारे खिडक्या नसलेले गाव

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यामध्ये शनी–शिंगणापूर नावाचे एक गाव असून, हे गाव शिर्डीपासून सुमारे शंभर कि.मी.

अंतरावर आहे.

या गावामध्ये शनीचे देवस्थान असून, हे देवस्थान अत्यंत जागृत आहे.

या गावातील घरांना खिडक्या व दरवाजे नाहीत. या गावातील लोक आपल्या घरांना कुलूप लावीत नाहीत. घरातील ट्रंकांना-सुटकेसेसना कुलूप लावीत नाहीत. घरातील सर्व वस्तू उघड्या पडलेल्या असतात. शनिदेव या सर्वांचे रक्षण करत असतो. या गावात कधी चोरी होत नाही. चोर चोरी करू शकत नाही.

शनिदेवाच्या आज्ञेमुळे गेली दोनशे वर्षे या गावातील लोक आपल्या घराला दारे-खिडक्या बनवत नाहीत. येथे चोरी करणारा आंधळा होतो.

### अगस्ती गुहा

माऊंट अबूच्या जंगलामध्ये अगस्ती नावाची एक गुहा असून, येथे एक पडके शिवालय आहे. शिवालयासमोर पाण्याचे एक कुंड आहे. दर पौर्णिमेला रात्री बारा वाजता या पाण्याच्या कुंडातून एक जलधारा शिवलिंगावर पडते.

### अद्‌भुत शिवलिंग बिजली महादेव

हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्याला 'देवतांचा प्रदेश' असे म्हटले जाते. कुल्लू जिल्ह्यामध्ये एकूण ३६५ गावे आहेत.

प्रत्येक गावाची एक स्वतंत्र देवता आहे. त्या देवतेचे शासन त्या गावावर चालते. देवतेच्या आज्ञेशिवाय गावातील कोणीही व्यक्ती काहीही करू शकत नाही.

कुल्लू जिल्ह्यात मथाण नावाचे एक गाव आहे. हे गाव कुल्लू शहराच्या जवळच आहे. येथून कुल्लू शहराचा देखावा अतिशय मनोरम दिसतो. या 'मथाण' गावाच्या डाव्या बाजूला 'पार्वती' नदी वाहते, तर उजव्या बाजूला 'विपाशा' नदी वाहते.

लोकांची अशी श्रद्धा आहे की, कुलंत नावाचा एक राक्षस येथील देवतांना खूप त्रास देत होता. या दानवाच्या त्रासातून सुटका व्हावी म्हणून सर्व देवतांनी भगवान् शंकरांना प्रार्थना केली. भगवान् शंकर या राक्षसाचा वध करण्यासाठी निघाले. त्यांनी आपल्या त्रिशुलाने कुलंत राक्षसावर प्रहार केला. या प्रहाराने कुलंत राक्षसाचा मृत्यू झाला; परंतु हा राक्षस पुन्हा जिवंत होईल, अशी शंका देवतांना सतावू लागली, म्हणून भगवान् शंकरांनी इंद्राला या जागेवर पुन्हा पुन्हा वीज पाडावयास सांगितली. हेतू असा की, यदाकदाचित तो दानव जिवंत झाल्यास विजेच्या प्रहाराने पुन्हा त्याचा मृत्यू व्हावा.

कालांतराने या जागेवर शिवलिंगाची स्थापना करण्यात आली व मंदिर बांधले गेले. आजही या मंदिरावर दर दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी वीज पडते. वीज पडल्याने मंदिराचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होत नाही; परंतु शिवलिंगाचे तुकडे होऊन

जातात. हे तुकडे पुष्कळवेळा कित्येक मैल दूर जाऊन पडतात. मंदिराचा पुजारी भक्तांकरवी या सर्व तुकड्यांना गोळा करून पुन्हा शिवलिंगाची स्थापना करतो. विशेष म्हणजे हे सर्व तुकडे आपोआप जोडले जातात. तुकडे गोळा करण्याच्या कामात अनेक चमत्कार सहकार्य करतात. स्वप्नामध्ये पुजाऱ्याला हे तुकडे कण्हत आहेत, असे दिसून येते व ते कुठे पडले आहेत हेही दिसून येते. पुजारी भक्तांच्या सहकार्याने कित्येक मैल अंतरावर पडलेले तुकडे मागवून एकत्र करून लोण्याने शिवलिंगाच्या तुकड्यांना एकत्र जोडतो. लोण्याने तुकडे जोडल्यावर पुजारी शिवलिंग टोपलीने झाकतो. त्या टोपलीने पूर्ण शिवलिंग झाकले जाते. शिवलिंग पूर्णपणे जोडले जाईपर्यंत पुजारी, तसेच गावातील लोक व सरपंच व्रतस्थ राहतात. काही दिवसांनी शिवलिंग आपोआप जोडले जाते व टोपली आपोआप उलटी होते.

## शस्त्राविना शस्त्रक्रिया

भारतामध्ये फार पूर्वी बोटाने शस्त्रक्रिया करीत असत. समजा एखाद्याच्या पोटामध्ये एखादी गाठ किंवा अल्सर आहे तर अशा रोग्याला पाठीवर झोपवीत व त्याच्या पोटावरून बोट फिरवीत. सुरीने कापल्याप्रमाणे पोट उघडे होई. नंतर पोटामध्ये हात घालून स्पिरिच्युअल डॉक्टर ती गाठ कापून काढत असे व रोग्याच्या पोटावरून हात फिरविताच कापलेला सर्व भाग

आपोआप जोडला जाई. एक थेंबही रक्त बाहेर येत नसे. रोग्याला वेदना होत नसत.

हे सर्व कसे घडत असे हे समजावयास मार्ग नाही. पूर्वी ही विद्या भारतात होती. आता ही विद्या फिलिपाईन्समध्ये आहे.

जपान व कोरियामध्येही अशा प्रकारे शस्त्रक्रिया करणारे दोन-चार डॉक्टर आजही आहेत.

## काळ आणि अवकाश
## (Time and Space)

काळ व अवकाश या दोन मितींवर विजय मिळविण्यासाठी योगी विविध प्रकारच्या साधना करतात.

या साधनांचे वर्णन पुस्तकातून करता येत नाही. या साधनेतील रहस्यमय भाग बाजूला ठेवून साधनेतील अद्भुतता खाली देत आहे.

योगी ताज्या टवटवीत फुलांची माळ गळ्यात घालून समाधी लावून बसतात. ही समाधी कधी चाळीस दिवसांची असते, तर कधी तीन महिन्यांची असते.

समाधी लावताना गळ्यात फुलांची माळ घातली, ती समाधीतून उठल्यानंतरही जशीच्या तशी राहते. फुले कोमेजत नाहीत. जणू काही आताच गळ्यात माळ घातली आहे असे वाटते असे घडल्यानंतर योग्याला काळ व अवकाश या मितींवर

विजय प्राप्त झाला असे मानतात.

## ज्योतिष

दर २१६० वर्षांनी पृथ्वीवर प्रलयंकारी स्थिती निर्माण होते. जे जुने आहे ते बऱ्याच अंशी लयाला जाते व नवीन गोष्टींचे सृजन होते. अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे २१६० X १२ = २५,९२० वर्षांनी महाप्रलय होतो. जे जुने आहे त्यातील जवळजवळ सत्तर टक्के नष्ट होते. अनेक भूभाग समुद्रात गडप होतात. समुद्रातील भूभाग वर येतात. पृथ्वीचा आस ढळतो. दक्षिण धृव व उत्तर धृव यांची स्थाने बदलतात. पृथ्वीचे आकाशातील स्थान बदलते. इ.स. २१६०च्या आसपास पृथ्वीवर अशा प्रकारची प्रलयंकारी स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. २५९२० वर्षांचे चक्र इ. स. ४००० च्या आसपास पूर्ण होईल.

## राजापूरची गंगा

महाराष्ट्रातील राजापूर येथे दर तीन वर्षांनी गंगा येते. या स्थानामध्ये चौदा कुंडे असून, काही क्षणांत ही चौदा कुंडे भरून वाहू लागतात. सुमारे तीन महिने गंगा येथे राहते व मग एकदम अदृश्य होते. एका रात्रीत सर्व पाणी गायब होते.

राजापूरची गंगा या स्थानापासून अर्धा मैल अंतरावर जवळच उन्हाळा नावाचे एक स्थान असून, येथे गेली शेकडो

वर्षे गरम पाण्याचा धबधबा आहे. येथील पाण्यात स्नान केले असता चर्मरोगांचे निवारण होते.

## ज्वालामुखी माता

हिमालयात अनेक ठिकाणी ज्योतिस्थाने आहेत. या स्थानांना गोरखडीब्बी किंवा ज्वालामुखी माता असे म्हणतात. कितीही बर्फ पडला, तरी या ज्योति विझत नाहीत.

सुमारे चारशे वर्षांपूर्वी एका मुस्लीम बादशहाने ज्वालामुखी मातेच्या मंदिरातील ज्योति विझविण्यासाठी तिच्यावर सतत पाणी ओतत राहण्यास आपल्या सैन्यास सांगितले. अनेक दिवस पाणी ओतूनही या विझल्या नाहीत. उलट ज्योति, पाण्यावर तरंगू लागल्या. आजही काही ज्योति पाण्यावर तरंगत असतात.

या ज्योतींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या ज्योतिसमोर दुधाने भरलेले भांडे धरताच ती ज्योत त्या भांड्यामध्ये वाकडी होऊन दूध पिऊन टाकते.

शास्त्रज्ञांना हे काय गूढ आहे हे अद्याप समजलेले नाही.

शास्त्रज्ञ म्हणतात की, भूगर्भामध्ये गॅसचे प्रचंड भांडार असून, त्यांच्या या ज्योति असाव्यात, पण या ज्योति दूध कशा पितात याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. हे एक अद्‌भुत आश्चर्य आहे.

# समाप्त

परोपकारार्थं इदं शरीरम्।

ईश चिंतनार्थं इदं मनः ।

विवेकार्थं इदं बुद्धिः ।

ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।

शरीर परोपकार करण्यासाठी आहे.

मन ईश्वर चिंतनासाठी आहे.

बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)

यांचा विचार करण्यासाठी आहे.

जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.

- श्री स्वामी दत्तावधूत